शनिवार, 08 ऑक्टोबर 2022
किंमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 02 अंक - 64
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

MARATHI • DAINIK • AURANGABAD (MAHARASHTRA) • SATURDAY 08 OCTOBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-02 • ISSUE-64 • TITLE CODE : MAHMAR51117 • PAGE-08 • PRICE-5


# रुपयाचा नवा निचांक

## ८२.३३ पर्यंत झाले अवमूल्यन; वर्षभरात १० टक्क्यांनी घट !

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : गेल्या काही दिवसांपासून रुपयाचा उलट्या दिशेने सुरू असलेला प्रवास अद्याप थांबण्याचं नाव घेत नाहीये. शुक्रवारी रुपयानं नवा नीचांक गाठला आणि बाजारपेठेत चिंतेचं वातावरण पसरलं. शुक्रवारी रुपयानं १६ पैशांची मोठी घट नोंदवली. त्यामुळे अमेरिकी डॉलरच्या तुलनेत रुपयाचा दर थेट ८२.३३ पर्यंत जाऊन पोहोचला आहे. रुपयाच्या अवमूल्यनाची अनेक कारणं समोर येत असली, तरी त्यामध्ये कच्च्या तेलाच्या किमतींचं प्रमुख कारण दिलं जात आहे. याशिवाय, अमेरिकी बॉण्डचे दर, गुंतवणूकदारांमधला निरुत्साह हे घटकदेखील यासाठी कारणीभूत ठरल्याचं तज्ज्ञांचं मत आहे.**

आज सकाळी साडेनऊच्या सुमारास रुपयाचा दर डॉलरच्या तुलनेत ८२.३० इतका होता. याआधीच्या ८१.८९ दरावरून रुपया बाजार उघडताच ८२.१९ वर गेला आणि अजून खाली उतरत ८२.३३पर्यंत घटला. गुरुवारी तर ५५ पैशांनी रुपया उतरला होता. त्यामुळे दिवसेंदिवस रुपयाच्या होणाऱ्या अवमूल्यनामुळे बाजारपेठेत आणि गुंतवणूकदारांमध्ये चिंतेचं वातावरण निर्माण झालं आहे. दरम्यान, गेल्या वर्षभरात रुपयानं तब्बल १० टक्क्यांची घट नोंदवल्याचं समोर आलं आहे. पीटीआयच्या हवाल्याने एनडीटीव्हीनं दिलेल्या वृत्तानुसार, आरबीआयनं सातत्याने परकीय गंगाजळीच्या विक्रीतून रुपयाचं अवमूल्यन रोखण्यासाठी प्रयत्न करूनही रुपयाचा उलटा प्रवास थांबवण्यात अपयश येत आहे.



### आठवड्याच्या शेवटी सेन्सेक्स, निफ्टी गडगडला

आज शेअर बाजाराच्या सुरुवातीला मिडकॅप, बँका आणि आयटीच्या घसरणीने मार्केट खाली खेचला आहे. धातू समभागांवरही आज दबाव आहे. निफ्टी १७,३०० च्या खाली उघडला आहे आणि आज ऑटो समभागातील हेवीवेट देखील कमजोरीसह व्यवहार करत आहेत. सुरुवातीच्या सत्रात सेन्सेक्स १८६ अंकांनी घसरून ५८०३६ वर तर, निफ्टी ५२ अंकांनी घसरून १७२७९ च्या पातळीवर होता. टायटनने सुरुवातीच्या व्यवहारात निफ्टी टॉप गेनरमध्ये ४.४२ टक्क्यांची उसळी घेतली आहे. याशिवाय हिरो मोटर्स, मारुती, एचसीएल टेक आणि एसबीआय लाईफ या कंपन्यांनाही तेजीत दिसत आहेत. हिंदाल्को, बीपीसीएल, आयसीआयसीआय बँक, एचडीएफसी बँक आणि इंडसइंड बँक सर्वाधिक घसरले.

### चर्चेतली बातमी

## ‘आदिपुरुष’वरून मनसेने ठोकला भाजपविरुद्ध शड्डू



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** आदिपुरुष सिनेमाची चर्चा फक्त चाहते किंवा सोशल मीडियावरच होतेय असं नाही तर आता राजकीय वर्तुळातही याचे पडसाड उमटलेले दिसतात. भाजपचे आमदार राम कदम यांनी महाराष्ट्रात ‘आदिपुरुष’ सिनेमा प्रदर्शित होऊ देणार नाही असे सांगितले होते. मात्र आता सिनेमाला मनसेचा पाठिंबा मिळाला आहे. महाराष्ट्र नवनिर्माण चित्रपट सेनेचे अध्यक्ष अमेय खोपकर यांनी यासंदर्भात ट्वीट करून आपली प्रतिक्रिया दिली. यात त्यांनी काही मुद्दे मांडत ओम राऊतला पाठिंबा दिला. सलग केलेल्या दोन ट्वीटमध्ये त्यांनी आदिपुरुष सिनेमात ओम राऊत याच्याकडून अभ्यासपूर्ण मांडणी केल्याचा दावा त्यांनी केला. मराठी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत अमेय यांनी स्पष्ट केले की, ‘ओमने याआधी ‘लोकमान्य’ आणि ‘तान्हाजी’ सारखे सिनेमे केले आहेत.

## २७ कोटींचे घड्याळ!

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** परदेशातून अमली पदार्थ आणि सोन्याची तस्करी करुन देशात आणण्याचे प्रयत्न विमानतळावरील सुरक्षा यंत्रणा आणि सतर्क अधिकाऱ्यांमुळे हाणून पाडले जातात. अनेकदा विमानतळावर अमली पदार्थ जप्त करण्यात आल्याच्या किंवा सोन्याचे दागिने लपून आणण्याच्या प्रयत्नात परदेशी तसेच भारतीय प्रवाशांना ताब्यात घेतल्याच्या बातम्या वाचनात येतात. मात्र दिल्ली विमानतळावर तब्बल २८ कोटींच्या घड्याळांची तस्करी करताना एका प्रवाशाला अटक करण्यात आली आहे.

एएनआय या वृत्तसंस्थेनं यासंदर्भातील माहिती दिली आहे. दिल्लीमधील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर ही कारवाई करण्यात आली आहे. हातावर बांधण्याची महागडी घड्याळं बेकायदेशीररित्या भारतात आणण्याच्या प्रयत्नात असलेल्या एका प्रवाशाला ताब्यात घेतलं आहे. कस्टम विभागाच्या अधिकाऱ्यांनी या प्रवाशाला महागड्या घड्याळांची तस्करी करताना रंगेहाथ पकडलं. एकूण सात घड्याळं ताब्यात घेण्यात आली असून यापैकी एका घड्याळाची किंमत ही २७ कोटी ९ लाखांहून अधिक आहे.



एएनआयने दिलेल्या फोटोंमध्ये दोन घड्याळं दिसत आहेत. यापैकी एका घड्याळ हे ‘जॅकोब अॅण्ड कंपनी’चं आहे. बीएल ११५.३० असं या घड्याळाच्या मॉडेलचं नाव आहे. या घड्याळाची किंमत २७ कोटी ९ लाख २६ हजार ५१ रुपये इतकी आहे. तर दुसरं घड्याळ हे ‘रोलेक्स’ या कंपनीचं आहे. या घड्याळाची किंमत ही १५ लाख ५९ हजार ३५८ रुपये इतकी आहे. मागील काही दिवसांमध्ये मुंबई विमानतळावरही अमली पदार्थांच्या तस्करीची दोन मोठी प्रकरणं समोर आली आहेत.

## ईडीचे दिल्ली, पंजाबसह हैदराबादमध्ये ३५ ठिकाणी छापे

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** ईडीने शुक्रवारी (७ ऑक्टोबर) दिल्ली-एनसीआर, पंजाब आणि हैदराबादमध्ये जवळपास ३५ ठिकाणी छापेमारी केली. दिल्ली मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात ही कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईवर दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी घाणेरड्या राजकारणासाठी अनेक अधिकाऱ्यांचा वेळ वाया घालवला जात असल्याची प्रतिक्रिया दिली.

अरविंद केजरीवाल म्हणाले, “मागील




तीन महिन्यात ५०० छापे टाकण्यात आले. यासाठी ३०० हून अधिक सीबीआय आणि ईडीचे अधिकारी २४ दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनिष सिसोदिया यांच्याविरोधात पुरावा शोधत आहेत. मात्र, त्यांना काहीही पुरावा मिळाला नाही. अनेक अधिकाऱ्यांचा वेळ यांच्या घाणेरड्या राजकारणासाठी वापरला जात आहे.” ईडीने या प्रकरणात एकूण १०३ छापे टाकल्याचं सांगितलं जात आहे. याशिवाय इंडोस्पिरिट या दारू निर्मिती कंपनीचे व्यवस्थापकीय समीर महंद्रू यांनाही अटक केली आहे.

# राज्यात सर्वदूर पाऊस, शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान

## हवामान खात्याकडून अलर्ट : पुढचे काही दिवस विजेच्या कडकडाटासह पाऊस

आधुनिक केसरी न्यूज

मुंबई : राज्यात अनेक ठिकाणी परतीच्या पावसाने दाणादाण उडवली आहे. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेतल्यामुळे बळीराजा संकटात सापडला आहे हा परतीचा पाऊस पुढचे काही दिवस थैमान घालण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तविली आहे.

हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार मुंबई शहर, उपनगर आणि आजूबाजूच्या भागात पावसाच्या हलक्या सरी किंवा विजांच्या कडकडाटासह शनिवारी पाऊस पडण्याची शक्यता आहे. पुढचे दोन दिवस मुंबईसह राज्यातील काही भागात ढगाळ वातावरण राहणार असल्याचे सांगण्यात




आले. तसेच पावसाच्या हलक्या सरी बरसण्याची चिन्हे आहेत. त्यानंतर 11 आणि 12 ऑक्टोबर रोजी ढगाळ वातावरण आणि विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. विदर्भ, मराठवाड्यासह अनेक ठिकाणी मध्यम ते जोरदार पावसाने हजेरी लावली आहे. पावसाची हजेरी, ढगाळ हवामानामुळे कमाल तापमानात चढ-उतार होत आहे.

विजांसह पावसाचा इशारा कोकणातील पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या भागात होणार आहे. तर मध्य महाराष्ट्रतील नंदूरबार, धुळे, जळगाव, नाशिक, नगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, मराठवाड्यातील औरंगाबाद, जालना, बीड, उस्मानाबाद, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर. विदर्भात बुलडाणा, अकोला, वाशीम, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर या जिल्ह्यात जोरदार पाऊस होण्याची शक्यता आहे.

हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार मुंबईत काही काळ पाऊस तळ ठोकण्याची शक्यता आहे. मुंबईसह उपनगरात हलक्या ते मध्यम सरी कोसळण्याची शक्यता आहे. या काळात मुंबईत मुसळधार पाऊस पडणार नसून पावसाच्या हलक्या सरी बरसतील.

### कोल्हापूर जिल्ह्यात पावसाने हाहाकार

कोल्हापूर जिल्ह्यात परतीच्या पावसाने आठवडाभरात दुसऱ्यांदा हाहाकार केला. गुरुवारी सायंकाळपासून ते संध्याकाळपर्यंत कोल्हापूर शहरासह जिल्ह्यामध्ये अनेक ठिकाणी ढगफुटीसदृश्य पाऊस झाला. या पावसाने अनेक ठिकाणी दाणादाण झाली. जिल्ह्यात सोयाबीन आणि भात कापणीला वेग आला असतानाच परतीचा पाऊस दणका देत असल्याने शेतकरी चिंतातूर झाला आहे. जयसिंगपूर, इचलकरंजी तसेच असळज-गगनबावडा भागामध्ये ढगफुटीसदृश पाऊस झाला. कुंभी नदीवरील रेव्याचीवाडी, कातळी बंधारे पाण्याखाली गेले. कुंभी धरणातून 600 क्युसेक विसर्ग करावा लागला. दुसरीकडे हातकणंगले तालुक्यातील घुणकी गावामध्ये वीज कोसळून दीड एकरातील ऊस जळाला. येथील दत्त मंदिराशेजारी वीज कोसळल्याने दीड एकरातील ऊस जळून खाक झाला.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## चांदणे तुझ्या स्मरणाचे ...

आधुनिक केसरी

'आईचा हा लाख मोलाचा सल्ला मला एक वेगळीच दृष्टी देऊन गेला. आता कोणत्याही माणसाच्या वागण्याची कारणमीमांसा मला कळू लागली. आपण समोरच्या व्यक्तीला समजून घेतले तर निम्मे प्रश्न सुटतात. बाकीचे प्रश्न मग त्याच्याशी बोलून, समजूत घालून सोडवता येतात. थोडक्यात म्हणजे दुसऱ्यांच्या अंतरंगात शिरण्याची शिकवण तिने मला दिली. तिने शिकवलेली दुसरी गोष्ट म्हणजे ' राखावी बहुतांची अंतरे...' तिने जसे सांगितले तसेच ती वागत आली होती. कधीही समोरच्या व्यक्तीला आपल्या बोलण्याने तिने दुखावले नाही. त्यामुळे घरात आणि बाहेरही ती सर्वांनाच प्रिय होती. You cannot please everyone हे जरी खरे असले आणि कधी कधी रागवावेही लागते हे बरोबर असले तरी ते तात्कालिक असावे. काही क्षणांपुरती ती क्वचित रागावली असेलही कोणावर पण नंतर लगेच तिचा मूळ प्रेमळ स्वभाव उफाळून येई. तिने शिकवलेल्या या दोन गोष्टी जणू माझ्या रक्तात भिनल्या. म्हणून ' तो बोल मंद हळवासा आयुष्य स्पर्शुनी गेला ' असे मी म्हटले.

आमच्या गावाला आमच्या बऱ्याच नातलगांची शेती होती. ते कुठेतरी शहरात राहायचे पण शेतीचा हंगाम असला की एक दोन महिने आमच्याच घरी त्यांचा मुक्काम असायचा. पण आईने त्यांचा कधीच कंटाळा केला नाही. तिच्या हातचा स्वयंपाक, तिचे आदरातिथ्य त्यांना खूप आवडायचे. तिच्या हातच्या साध्या भाजी भाकरीला सुद्धा अमृताची चव होती. पूर्वी चुलीवरच स्वयंपाक असायचा. कधी कधी लाकडे ओली असायची. त्या धुराने तिच्या डोळ्यात पाणी उभे राहायचे. पण कोणतीही चिडचिड किंवा राग तिच्या मुद्रेवर कधीही नव्हता. सगळा स्वयंपाक ती अतिशय प्रेमाने करायची. किंबहुना तिच्या प्रेमळ भावना त्या अन्नात मिसळून त्याला एक वेगळीच चव यायची. आमचीही थोडीफार शेती असल्याने आणि वडील गावाचे पोलीस पाटील असल्याने आमच्याकडे येणारा जाणारा कायम असायचा. कोणी बडी व्यक्ती असो की अगदी गरिबातली गरीब व्यक्ती, तिच्याजवळ भेदभाव नव्हता. गावातील कोणीही काही मागायला आले तर तिने कोणालाही कधी विन्मुख पाठवले नाही.

(क्रमशः)



## आनंदी पहाट

## अतिविचारांनी विकार निर्माण होतात

आधुनिक केसरी

नकारात्मक विचारांची भिन्नविभिन्न कारणे असतात. अनाहूत नकारात्मक विचार हे ऑब्सेसिव्ह-कंपल्सिव डिसऑर्डर, सामान्यीकृत चिंता विकार किंवा इतर मानसिक आरोग्य स्थितीचे लक्षण असू शकतात. नकारात्मक विचार हे देखील नैराश्याचे लक्षण आहे. अतिविचार हा स्वतःहून निर्माण केला जाणारा केवळ मानसिक विकार नाही. ते सहसा इतर मानसिक आरोग्य स्थितींशी संबंधित असते. नैराश्य, चिंता विकार, आजारपण चिंता विकार, ज्याला काहीवेळा हायपोकॉन्ड्रियासिस किंवा आरोग्य चिंता म्हणतात, आपण गंभीरपणे आजारी आहात किंवा होऊ शकता याची जास्त काळजी करत बसण्याने देखील नैराश्य आणि नकारात्मकता बळावते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

त्याबाबतीत तुम्हाला कोणतीही शारीरिक लक्षणे नसतील, अतिविचार हा स्वतःचा मानसिक आजार नसला तरी देखील तो नैराश्य, चिंता, खाण्याचे विकार आणि पदार्थांच्या वापरातील विकार यासारख्या परिस्थितींशी संबंधित असू शकतो. तीव्र वेदना आणि जुनाट आजार असलेल्या लोकांमध्ये रुमिनेशन सामान्य असू शकते, त्या वेदनांबद्दल नकारात्मक विचारांचे रूप धारण करणे आणि त्यातून बरे होणे हे देखील शक्य होऊ शकते. सामान्यांमध्ये तणावग्रस्ततेमुळे डोकेदुखी, मायग्रेन, सायनसवर परिणाम करणारी परिस्थिती आणि कानाचे संक्रमण यांचा समावेश होतो. अर्थात या अशा प्रकारच्या समस्या दुर्मिळ आहेत. मेंदूतील रासायनिक बदल हा पोषक तत्वांची कमतरता, झोपेचा विकार, साखरेच्या अतिसेवनामुळे बॅक्टेरियांची वाढ, नैराश्य किंवा थायरॉईडच्या स्थितीचे लक्षण असू शकतात. इतर सामान्य मेंदूच्या रासायनिक बदलांच्या कारणांमध्ये खूप वेळा खाणे, निष्क्रियता, पुरेशी झोप न मिळणे, दीर्घकाळचा ताण आणि खराब आहार यांचा समावेश होतो. नकारात्मक माहितीमुळे मेंदूच्या महत्त्वपूर्ण माहिती प्रक्रिया क्षेत्रामध्ये क्रियाकलाप वाढतात, आपले वर्तन आणि वृत्ती, वाईट बातम्या, अनुभव आणि माहिती यांच्याद्वारे अधिक प्रभावीपणे आकार घेतात.



आधुनिक केसरी

### हरिनामावीना | मोक्ष नाही ||

अहंकारा पोटी | विनाश नांदतो ||
सर्वनाश होतो | आयुष्याचा ||१||

निंदक वंदक | दोन्हीही घातक ||
होतात जाचक | सावधान ||२||

स्वार्थी या जगाचा | खेळ असे न्यारा ||
मायेचा पसारा | ओळखावा ||३||

साधक बाधक | करूनी विचार ||
ठेवावा आचार | सर्वकाळ ||४||

संतवाणी सदा | आचरावी मना ||
हरिनामाविना | सुख नाही ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "निरूपण"

आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर


**जगदम्ब नमस्तुभ्यं नमस्तुभ्यं नमो नमः।**
**श्रीरेणुके नमस्तुभ्यं कल्पवल्लि नमो नमः।।४० ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. तुला नमस्कार असो. तुला नमस्कार असो. श्रीरेणुके, तुला नमस्कार असो. हे कल्पवल्ली, तुला नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं भयनाशिनि ते नमः।**
**अभयदे नमस्तुभ्यं सर्वदे ते नमो नमः।।४१ ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. भय नष्ट करणारे तुला नमस्कार असो. अभय देणारे तुला नमस्कार असो. सर्व काही देणारे, तुला नमस्कार असो.

## मनाचे श्लोक



आधुनिक केसरी

**धुरुं लेकरु बापुडे दैन्यवाणे।**
**कृपा भाकिता दीधली भेटि जेणे।**
**चिरंजीव तारांगणी प्रेमखाणी।**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी।।११७।।**

**अर्थ :** पांच वर्षांचे बाळ ध्रुव! बापडे आणि दीनवाणे झालेले, पण त्याने हाक मारताच देव त्याच्या भेटीसाठी तातडीने धावले. त्याला तारांगणात अढळ पद दिले. ह्यावरून देव भक्ताला उपेक्षित नाहीत असे नाही का होत?

**भावार्थ :** मागील श्लोकापासून देव भक्तांचे रक्षण करतो असा अर्थ असलेले दहा श्लोक श्री समर्थांनी इथे दिले आहेत. यात पुराणांतील कथांचा समावेश आहे. आपल्या पैकी काही जणांनी या कथा लहानपणी ऐकल्या असतील. उत्तानपाद राजाला दोन राण्या होत्या. एक सुनीति आणि सुरुचि. सूनिति नावडती राणी तर सुरुची आवडती राणी होती. सुनीतिचा मुलगा ध्रुव. त्याला बडिलांच्या मांडीवर बसायचे असते. पण सुरुचिच्या मोहामुळे राजा त्याला मांडीवर बसू देत नसे. ध्रुवाला खूप वाईट वाटत असे. तो आईला अनेक प्रश्न विचारी. बाबा मला मांडीवर का बसू देत नाहीत, असा प्रश्न त्याला कायम पडे. एकदा त्याच्या मनांने घेतले की आपण अशी जागा मिळवू की तिथून कोणी आपल्याला उठ म्हणणार नाही. पुढे नारद मुनींच्या कृपेने तो नारायण नारायण असा जप करू लागला. यथावकाश साधना फलित झाली आणि भगवंत प्रसन्न झाले आणि ध्रुवास अढळपद लाभले.

**"ना तरी वैकुंठपीठनायकें । रुसला ध्रुव कवतिकें ।**
**बुझाविला देऊनि भातुकें । ध्रुवपदाचें ॥" (ज्ञा. १०/१८)**

( वैकुंठाधीश प्रभूने रुसलेला जो ध्रुव, त्यास अढळपदाचा खाऊ देऊन कौतुकाने समजावले)

कथा इथे संपत नाही तर सुरू होते. ती कशी ते आपण पाहू...

आपल्या मनात देखिल दोन राण्या असतात. एक असते सुनिती आणि एक असते सुरुची. सुनिती म्हणत असते की रुचिच्या मागे न जाता नीतीच्या मागे जावे. आईने केलेले सात्विक भोजन करावे आणि सुरुची सांगत असते की नाक्यावर मिळणारी भजी, वडापाव, पावभाजी, पाणी पुरी खावी. आपण नेमके कोणाच्या आहारी जातो ते पहावे. सुनिती म्हणत असते की पहाटे उठून अभ्यास करावा, साधना करावी म्हणजे भगवंतांच्या चरणी मन जडेल. मनुष्याचे चित्त स्थिर होऊ शकेल. लवकर उठल्याने घाई गडबड होणार नाही. आरोग्य उत्तम रहाण्यास मदत होईल. त्याचवेळी सुरुचि म्हणत असते की हवेत गारठा आहे, दुलईतून उठू नकोस, छान झोपून जा. त्यामुळे मनुष्याची किती कशी हानी होते याची आपल्याला कल्पना असेल. सुनिती सांगते की तू स्वतः निंदा सहन कर आणि पण लोकनिंदा करू नकोस, परंतु सुरुची मनुष्य मात्र मनुष्याला निंदा सहन करू देत नाही आणि उलट, निंदा करावयास मात्र हमखास भाग पाडते. इथे समर्थ आपल्याला सांगतात की सुनितीचे ऐकायचे आहे आणि स्वतःचे हीत साधायचे आहे की सुरुचीचे ऐकून आत्मघात अर्थात पुन्हा जन्ममृत्यूच्या फेऱ्यात अडकून पडायचे याचा निर्णय विवेकाने ठरवावा. देव 'भक्ताभिमानी' आहे म्हणजे आपण आधी भक्त व्हावयास हवे. स्वाभाविकच, सुनीतिच्या 'पक्षात'आपण असले पाहिजे. किमान तसा प्रयत्न तरी केला पाहिजे. सातत्यानं प्रयत्न केला तर यथावकाश देव आपला अभिमान धरून आपले रक्षण करील यात संदेह नसावा.

**-दास चैतन्य, संपर्क : ८३८००१९६७६**

## ।। सच्चिदानंद परमात्म्याला सगुणाच्या आधारानेच पाहता येईल ।।

आधुनिक केसरी

परमात्मा सच्चिदानंदस्वरूप आहे हे जरी खरे, तरी ते स्वरूप सगुणाच्या आधाराशिवाय आपल्याला पाहता येणार नाही. आपण भगवंताला सगुणात पाहावे तेव्हाच त्याच्या विभूतीचे आपल्याला आकलन होईल. म्हणूनच समर्थांनी 'निर्गुण ओळखून सगुणात रहावे' असे म्हटले आहे. सत्य हे शांत आणि आनंदमय असले पाहिजे; हेच भगवंताचे मूळ स्वरूप आहे. ही सर्व सृष्टी भगवंतानेच उत्पन्न केली असून, तिच्यामध्ये तो व्यापून राहिला आहे. अर्थात्, सर्व सृष्टी आनंदमय असूनही ती तशी दिसत नाही; हा भ्रम आहे. डोळ्याच्या आतमध्ये पाहण्याची शक्ति नसेल तर बाह्य डोळा असूनही दिसत नाही; परंतु आंतमध्ये शक्ति असली, तरी ती आहे असे बाह्य डोळ्यांशिवाय कळत नाही. त्याचप्रमाणे, सगुण आणि निर्गुण यांचा संबंध आहे. सत्य हे अखंड टिकणारे आहे म्हणून ते शांत आहे; म्हणून सनातन आहे. ते शांत आणि सनातन आहे म्हणून त्याच्याच ठिकाणी समाधान आहे; कारण अशांतामध्ये आनंद असणे शक्य नाही. म्हणून सत्य हे परमात्मस्वरूप होय. परमात्मस्वरूपी सत्य हे व्यावहारिक भाषेत सांगितले पाहिजे. पण व्यावहारिक सत्य मात्र निराळे असते. ही सृष्टी भगवंताने निर्माण केली आहे, म्हणून तिच्यामध्ये सर्व ठिकाणी भगवंताचे अस्तित्व असले पाहिजे. याचा अर्थ असा की, प्रत्येकामध्ये भगवंताच्या अस्तित्वाची जाणीव करून देणारा असा एक गुण आहे. हा गुण म्हणजे जगण्याची हौस होय. सर्वांना शांति मिळावी हाच भगवंताचा हेतू आहे. ही शांति परिस्थितीवर अवलंबून नाही. शांति एकपणात आहे, द्वैतात नाही. एकामध्ये ज्याचे मन गुंतले, ज्याने आपले मन भगवंताकडे ठेवले, त्यालाच शांतीचा लाभ होतो; मग त्याची इतर परिस्थिती कशीही असो. प्रपंचाचा अनुभव कष्टमय आहे, पण भगवंताचा अनुभव आनंदमय आहे खास, आणि त्याकरिता त्याच्या नामाचे अनुसंधान हे एकच साधन आहे. भगवंताला पहायचे असेल तर आपल्यालाही तसे व्हावे लागते. सत्त्वगुणात भगवंत असतो; तेव्हा आपण त्या मार्गाने जावे. आजारी माणसाला तीन गोष्टी कराव्या लागतात. कुपथ्य टाळणे, पथ्य सांभाळणे, आणि औषध घेणे. त्याचप्रमाणे भवरोग्यालाही तीन गोष्टी कराव्या लागतात. मुख्य ध्येय परमात्मप्राप्ती. त्याच्या आड जे येईल ते कुपथ्य - दुःसंगती, अनाचार, अधर्माचरण, मिथ्या भाषण, द्वेष, मत्सर वगैरे - त्याचा त्याग करावा; परमात्मप्राप्तीला जे सहायक, पोषक सत्संगती, सद्विचार, सद्ग्रंथवाचन, आणि सदाचार - ते पथ्य; ते सांभाळावे, आणि अखंड नामस्मरण करणे हे औषधसेवन होय.



**आजचे बोधवचन :** आनंदरूप परमात्मा मिळविण्यासाठी सगुणोपासना पाहिजे. श्रीराम समर्थ

**-श्रीसद्गुरू ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

# पंतप्रधान स्वनिधी योनजेतून लघु उद्योजकांचा आर्थिक विकास करणार

## वित्त राज्यमंत्री डॉ. भागवत कराड : स्वनिधी योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** लघु उद्योजकांना रोजगार निर्मितीसाठी पंतप्रधान स्वनिधी योजनेतून वित्त पुरवठा केला जात आहे. फेरीवाले, फळविक्रेते, धोबी, चर्मकार यांच्यासह इतर व्यवसायिकांना स्वनिधीतून 10 हजारापर्यंतचा अल्प दरात कर्जपुरवठा केल्याने स्थानिक पातळीवर व्यावसायिकांचा आर्थिक विकास साध्य केला जाणार असल्याचे प्रतिपादन केंद्रीय वित्त राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांनी केले.

महानगरपालिका औरंगाबाद आणि स्टेट बँक ऑफ इंडिया यांच्या संयुक्त् विद्यमाने आयोजित आर्थिक समावेशन व वित्त सहाय्य अभियान मेळाव्याचे उद्‌घाटन श्री. कराड यांच्या हस्ते संत एकनाथ रंगमंदिर येथे झाले. या अभियानात लाभार्थ्यांना स्वनिधी कर्ज योजनेचे धनादेश वाटप डॉ.कराड व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमास जिल्हाधिकारी सुनील चव्हाण, महापालिका आयुक्त डॉ.अभिजित चौधरी, स्टेट बँक ऑफ इंडियाचे उपमहाप्रबंधक रवीकुमार वर्मा, विभाग प्रबंधक रोहित कशाळकर, उपविभागीय अधिकारी मंगेश केदार यांच्यासह इंडियन बँक, युनियन बँक, बँक ऑफ बडोदा, सेंट्रल बँक आदी बँकांचे व्ययस्थापक, प्रतिनिधी याचबरोबर लाभार्थी उपस्थित होते.




स्थानिक लोकांना रोजगार आणि व्यवसायासाठी पंतप्रधान स्वनिधी योनजेतून मदत केली जात असून यासाठी महानगर पालिकेमध्ये विशेष कक्षाची निर्मिती करण्यात आली आहे. या ठिकाणी कर्ज घेण्यासाठी अर्जदाराने कागदपत्रांसह नोंदणी करण्याचे आवाहन डॉ. कराड यांनी केले. यामध्ये सलून, पार्लर, भाजीपाला विक्रेते, फळविक्रेते, फेरीवाले, चहा टपरीवाले, अंडी आणि पाव विक्रेते, यासारख्या व्यावसायिकांना दहा हजारांपासून आर्थिक मदत कर्जस्वरुपात दिली जाणार आहे. यासाठी सर्व बँकांनी व जिल्हा प्रशासनाने कर्ज मिळवून देण्यामध्ये सहकार्य करावे असे निर्देश डॉ.कराड यांनी संबंधितांना दिले.

प्रधानमंत्री स्वनिधी योजना व्यवसायाबरोबर माणसं उभी करण्यासाठी महत्वपूर्ण ठरलेली असून आर्थिक् विकासासाठी कर्जाची साथ बँकेच्या माध्यमातून देत आहे. व्यवसायिकांनी आपला व्यवसाय वाढविण्यासाठी स्वनिधी योजनेचा लाभ घ्यावा. तसेच अटल पेंशन योजना, मुद्रा योजना, जीवन ज्योती योजना, यासारख्या सामाजिक सुरक्षितता प्रदान करणाऱ्या योजनांचाही लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी सुनील चव्हाण यांनी लाभार्थ्यांना केले.

शहरामध्ये महानगर पालिकेच्या माध्यमातून फेरीवाले व लहान व्यावसायिकांना कर्ज पुरवठा करण्यासाठी त्यांच्या अर्जांच्या नोंदणीची सोय महानगर पालिकेच्या कक्षात केली असून यासाठी अर्जदारांनी अर्ज करण्याचे आवाहन महापालिका आयुक्त डॉ.अभिजित चौधरी यांनी केले. आर्थिक समावेशन व वित्त सहाय्य समाजयोजनेच्या माध्यमातून नविन लाभार्थ्यांची नोंदणी याठिकाणी केली जाणार आहे. स्वनिधी योजनेच्या जिल्ह्याचा लक्षांक पूर्ण करण्याची ग्वाही श्री.चौधरी यांनी यावेळी दिली.

लाभार्थ्यांना प्रातिनिधीक स्वरुपात 10 हजार रु रकमेचा धनादेशांचे वाटप करण्यात आले. यामध्ये बुध्दम बोराडे, रईस अली, दिव्या हुबळीकर, दीपा बनकर, बाळासाहेब हिवराळे, किरण खांडेकर, जीवन कडुकर, ज्योती खरात, रेश्मा शेख, साजेद गुलाम साजेद शेख यांचा समावेश होता. याबरोबरच मुद्रा योजनेअंतर्गत गणेश सूर्यवंशी व कृष्णा सूर्यवंशी, यांना दुग्धव्यवसायासाठी 7 लाख 80 हजारांचा धनादेशही देण्यात आला.

मनोजवं मारुततुल्यवेगमं जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्।
वातात्मजं वानरयूथमुख्यं श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये।।



श्री भद्रा मारोती औरंगाबाद

सौजन्य : जयसुख पटेल, जय भद्रा हनुमान सुखःतू रामायण, सिमंत गल्ली, शहागंज गांधी पुतळ्याजवळ, औरंगाबाद. मो : 9422201977

# ‘कमी पटसंख्या शाळा बंदचा निर्णय रद्द करा’

## गोरसेना संघटनेची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**देव्हारी :** ग्रामीण भागातील वाडी-वस्ती, तांडा, साखरशाळा, खडी केंद्र, तसेच दुर्गम भागातील 0 ते 20 पटापर्यंतच्या शाळा बंद करण्याबाबतचे शासन परिपत्रक रद्द करावे, अशी मागणी गोर सेना संघटनेचे तालुका अध्यक्ष आकाश राठोड, विद्यार्थी आघाडी तालुकाध्यक्ष सौरभ चव्हाण, तहसीलदार यांच्याकडे मागणी केली आहे. गोरसेना तालुका संघटनेचे अध्यक्ष आकाश राठोड यांनी सांगितले की, राज्याच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने दि. 21 सप्टेंबर रोजी राज्याच्या ग्रामीण भागातील 0 ते 20 पटाच्या शाळा बंद करण्याबाबतची कार्यवाही कुठपर्यंत आली असा आढावा घेणारे परिपत्रक काढले आहे. त्यानुसार राज्यात ठिकठिकाणी माहिती घेण्याची कार्यवाही सुरू झाली आहे. ग्रामीण भागातील शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्नाच्या 2.5 टक्के खर्च होतो, तो वाढवण्याची आवश्यकता आहे. राज्यात शिक्षकांची 67 हजार 755 पदे रिक्त आहेत. ती त्वरित भरावीत,त्याबाबतीत सकारात्मक निर्णय घेण्याऐवजी रिक्त पदे भरल्यास राज्य सरकारवर आर्थिक भार पडेल हे कारण पुढे करून नवीन भरती करण्याऐवजी शाळा बंद करण्याचा निर्णय घेणे दुर्दैवी आहे. या निर्णयाविरोधात पालकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली असल्याचे गोर सेना सामाजीक संघटने कडून सांगण्यात आले.

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे कर्वेनगरमध्ये शानदार पथसंचलन



राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे कर्वेनगर परिसरात पथ संचलन करण्यात आले.

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कर्वेनगरतर्फे बुधवारी ऑक्टोबर रोजी विजयादशमीनिमित्त पथसंचलन झाले. कर्वेनगर येथील काकडे पॅलेसपासून पथसंचलनास सकाळी साडेसात वाजता सुरवात झाली. अश्वारूढ ध्वज, घोषपथक, शेकडो स्वयंसेवकांचे शिस्तबद्द संचलनाने नागरिकांचे लक्ष वेधले. कर्वेनगरमधील नागरिकांनी ठिकठिकाणी रांगोळ्या काढून व स्वयंसेवकांवर पुष्पवृष्टी करून पथसंचलनाचे उस्फूर्तपणे स्वागत केले.

कर्वेनगर मधील काकडे पॅलेस मंगल कार्यालय येथून मावळे आळी वस्तीतून क्षिप्रा सोसायटीमधून पुढे स्पेंसर चौकातून, साई-सहवास, दत्त मंदिर, विकास मित्र मंडळ चौक मार्गे पुन्हा काकडे पॅलेस मंगल कार्यालय येथे अशा मार्गाने संचलन निघाले होते. या पथसंचलनात संभाजी भाग संघचालक अनिल व्यास, सह प्रांत प्रचारक सुनील साठ्ये, कर्वेनगर कार्यवाह चेतन भिसे आदींची मुख्य उपस्थिती होती.

# एमआयएमच्या आंदोलनात आंदोलक भडकले; पोलिसांनी घेतले ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** पैगंबर जयंतीनिमित्त शहरात दारु विक्री बंद ठेवावी व स्वच्छता मोहिम राबविण्यात यावी, या मागणीचे निवेदन देण्यासाठी आज एमआयएम पक्षाचे पदाधिकारी जिल्हाधिकारी कार्यालयात गेले होते. यावेळी आंदोलकांनी निवासी उपजिल्हाधिकारी संजय गायकवाड यांना निवेदन देण्याचा प्रयत्न केला. मात्र, पाच जणांनीच यावे, असे सांगताच आंदोलक भडकले. त्यांनी हुज्जत घालण्याचा प्रयत्न केला त्यामुळे आरडीसी गायकवाड हे गेले. त्यानंतर आंदोलनातून निघून खूर्चीला निवेदन चिकटवले. यावर हरकत घेवून आरडीसी डा आणि आंदोलकांमध्ये जोरदार शाब्दीक चकमक उडाली. अखेर पोलिसांनी वादात उडी घेत शहर आंदोलकांना ताब्यात घेतले आहे. येत्या ९ ऑक्टोबर रोजी पैगंबर जयंती साजरी होणार आहे त्या दिवशी जिल्ह्यात स्वच्छता मोहिमेसह दारु विक्रीवर बंदी आणावी, अशा आशयाचे



निवेदन घेवून एमआयएमचे पदाधिकारी धकारी कार्यालयात पोहचले होते. यावेळी आरडीसी संजय गायकवाड याना निवेदन देण्यासाठी पदाधिकारी गेले असता त्यांना अडविण्यात आले . केवळ पाच जणांना आतमध्ये सोडले जाईल असे सांगण्यात आले. त्यावर एमआयएमच्या पदाधिकाऱ्यांनी तीव्र हरकत घेतली. तसेच भेदभाव करत असल्याचा आरोप केला. हा गोंधळ बघून संजय गायकवाड यांनी आपली खूर्ची सोडली. एमआयएमच्या कार्यकर्त्यांनी ते गल्यानंतर त्यांच्या खूर्चीलाच त्या दालनात जावून निवेदन चिकटविले. शिवाय ठिकाणी ठिय्या आंदोलन सुरु केले. दरम्यान, गोंधळ वाढत असल्याने शहर पोलिस ठाण्याचे पीआय नितीन देशमुख आपल्या सहकाऱ्यांसह तेथे धडकले. त्यांनी आंदोलकांना समजविण्याचा प्रयत्न केला. तरीही आंदोलक हटायला तयार नव्हते. मग पोलिसांनी बळाचा वापर करून आंदोलकांना ताब्यात घेत पिंजरा गाडीतून शहर पोलीस ठाण्यात नेले . दुपारी उशीरापर्यंत पोलिसांची कार्यवाही सुरु होती.



# मुलांसाठीच्या ‘या’ कफ सिरपचे दुष्परिणाम ?

आधुनिक केसरी

आपल्या मुलांच्या आरोग्याची काळजी घेणे हे सर्वच पालकांचे आद्य कर्तव्य असते. यासाठी आपण सगळेच डोळ्यांत तेल घालून मुलांची काळजी घेत असतो. पण मुलांचे आजार बरे व्हावेत, म्हणून त्यांना देण्यात येत असलेली औषधंच त्यांच्यासाठी हानीकारक ठरू लागली, तर पालकांमध्ये चिंता पसरणं साहजिक आहे. WHO अर्थात जागतिक आरोग्य संघटनेनं नुकत्याच दिलेल्या एका इशाऱ्यामुळे भारतात उत्पादित आणि वितरीत होणाऱ्या चार कफ सिरपवर संशयाचे मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. WHO ने व्यक्त केलेल्या संशयानंतर भारत सरकारने या कफ सिरपची चौकशी करण्यास सुरुवात केली आहे. आफ्रिकेतील गॅम्बिया (The Gambia) या देशामध्ये नुकतीच तब्बल ६६ मुलांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे. हे मृत्यू या मुलांना देण्यात आलेल्या कफ सिरपमुळे झाल्याचा संशय WHO ला आहे. एनडीटीव्हीनं आरोग्य मंत्रालयातील सूत्रांच्या हवाल्याने दिलेल्या वृत्तानुसार WHO नं यासंदर्भात डीसीजीएला (Drugs Controller General of India) २९ सप्टेंबर रोजी सतर्कतेचा इशारा दिला आहे. डीसीजीएनं तातडीने या सगळ्या प्रकारावर हरियाणा प्रशासनाशी चर्चा करून चौकशी सुरू केली आहे. भारतातील हरियाणामध्ये उत्पादित होणारी ही कफ सिरप विदेशात, विशेषत: आफ्रिकी देशांमध्ये निर्यात होतात. याच कफ सिरपचा संबंध WHO कडून गॅम्बियामध्ये झालेल्या ६६ मुलांच्या मृत्यूच्या घटनेशी लावण्यात येत आहे. हे कफ सिरप आफ्रिकेच्या बाहेरही निर्यात झाले असण्याची शक्यता WHOकडून वर्तवण्यात येत आहे. “गॅम्बियामध्ये मृत पावलेल्या ६६ मुलांचा झालेला मृत्यू आणि किडनीला होणारे आजार यांचा या कफ सिरपशी संबंध असण्याची दाट शक्यता आहे”, अशी प्रतिक्रिया WHOचे प्रमुख डॉ. टेड्रॉस यांनी दिली आहे. WHO नं दिलेल्या माहितीनुसार, सर्दी आणि खोकल्यासाठी घेतल्या जाणाऱ्या या औषधांमध्ये प्रोमेथॅझाईन ओरल सोल्युशन (Promethazine Oral Solution), कोफेक्समॅलिन बेबी कफ सिरप (Kofexmalin Baby Cough Syrup), मेकऑफ बेबी कफ सिरप (Makoff Baby Cough Syrup) आणि मॅग्रिप एन कोल्ड सिरप (Magrip N Cold Syrup) या चार औषधांचा समावेश आहे. या औषधांच्या उत्पादक कंपन्यांची नावं अद्याप समोर आलेली नाहीत.

# विना अनुदानित शिक्षकांचे काय ?



लक्ष्मण वाल्डे
संपर्क क्र. 8888606068

आधुनिक केसरी

**डीएड काय..डीटीएड काय..सीईटी काय..टीईटी काय...याला पर्याय नोकरी हाय काय..,शिक्षक भरतीच काय..विना अनुदानित शिक्षकांच काय..? येणारी सरकार बोलती मेरी मूछ ,मेरी मूछ..बीच आती विरोधी पूंछ..,अरे अब तो सच बोलो तुम्हारी मूछ पे किसकी पूंछ । येणारी-जाणारी सरकार एकमेकांच्या मागे लपून वार करतांना दिसतय.तुम्हा-आम्हा डीएड-बीएड धारकांना शिक्षक भरतीविना आणि विना अनुदानित शाळावाल्यांना विना अनुदानाविनाच ह्या शिक्षकांच्या मयती, सरणाविनाच करतील अस वाटू लागले आहे .नुस्त खासतेल टाकून-टाकूनच,चिखा निघोस्तर जिवंतच मारणार की काय अशा ना-ना शंका मनात उमटायला लागल्या आहे.**

सरकार म्हणत आम्ही कुणाला नाराज करणार नाही.
सरकारी अंदाज पाहूण असं वाटतय विना अनुदानित शिक्षक आणि डीएड-बीएड विद्यार्थ्यांच्या पंक्तीला सरकार आता काहीच वाढणार नाही.बोलायच म्हणून बोलायच जीभ टाळुला लावून रेटून बोलायचं.असे बहूरुपीय सोंगे घ्यायला या लोकजाणत्या विश्वासव्यापी राज्यकर्त्यां सरकारला शोभेसा नाहीये.शिक्षकांच्या भरत्या करायच्या नव्हत्या.कारण संस्थाचालकांडून येणारा पैसा,दलालांच्या खिशात जायला अडथळा येणार म्हणून दलालांनी याची फुकांरी सरकारच्या कानात तर घुसवली नसेल ना ?कदाचित दलालांचा धंदा चालायचा नाही म्हणून शिक्षकांच्या भरत्या करायच्या नाही. विना अनुदानित शिक्षकांना पगार द्यायचा नाही. 20-40 वर खेळणाऱ्यांना सेंच्युरी मारु द्यायची नाही.असा डाव या श्रीमंत सरकारच्या मनात घोळमेळत तर नसेन ना? असे अनेक प्रश्न आता मनात उद्भभवायला लागली आहे.
बाजारात धंद्यासाठी टीईटी पासचे स्टॉल लावणारे दलाल. काही वेड-वाकड झाल की,कमेटी पावती दुसऱ्याच्या नावावर फाडतांना दिसताय.ज्यांची शिक्षक होण्याची पात्रता नाही त्यांना दलाल सांगता पैसे घेऊन या टीईटी पास करुन देऊ.आणि पैसे घेऊन टीईटी पासचे सर्टिफिकीट देऊ केले.आणि मग घोटाळा उघडकीस आला की आपला गुन्हा दूसऱ्याच्या माथी मारून अल्लादी निघून जायच,ऊसातून जायचं पण पान लागू द्यायचं नाही,अशी शक्कल लढवायची.मग गुन्हा फेटाळण्यासाठी परिक्षा पात्र करण्याची क्षमता ठेवणाऱ्या विद्यार्थ्यांना बोगस यादीत घालमेल करायचे,म्हणजे गव्हा बरोबर किडे ही रगडायचे. सरकार आणि जनता या मध्ये अनाजी पंथासारखे गद्दार माणसं सरकार विरुद्ध जनता असा राजकीय डावपेच खेळतांना दिसताय.सरकार चाळणीवर-चाळणी लावत गेले. याचा फायदा दलालांनी घेऊन,पास होण्याऱ्या विद्यार्थ्यांच्या जागी,पैसे देणाऱ्या विद्यार्थींना पासचे सर्टिफिकेट वाटले. एवढी मोठी हिंम्मत करायला,एखांद्या मोठ्या माणसाचा हात पाठिवर लागतो.त्या शिवाय असा घोळ घालने शक्य होत नाही.हे तर नकळणाऱ्यालाही कळते.मग हे अजून सरकारला कसे कळाले नसावे.अशा शंका सरकार विरोधी ओठांवर येणे साहाजिक आहे.हा दुतर्फी मुखवटा पाहून कोणाकडे बोट दाखवावे अशी द्विभावना स्थिती झाली आहे.
दलालाने बगलाखाली दाबलेल्या चुका आता गोचिडे होऊन चिपकायला लागली म्हणून दलालांनी बगल वस्ताऱ्यांनी काढून हात वरती करून मोकळे झाले.त्यांना काहीच फरक पडला नाही का.., का पडू दिला नाही ? पण फरक पडला तो गरिबांच्या पोरांवर अभ्यास करुनही त्यांना मास्तर होता आलं नाही.आणि पोराला मास्तर करण्यासाठी लागणारा पैसा बापाला शाळेवर भरता आला नाही.बऱ्याच बापांनी पोट भरणाऱ्या काळ्या मायला कवडीमोल विकून संस्थाचालकांची घरे भरली.आणि त्याच संस्थाचालकांनी लाचखोर दलालांची घरे भरली.त्या दलालांनी कामे न करता खाऊन-पिऊन डकारी दिल्या.आता भोगाव लागतंय ते बिनपगारी शिक्षकाला-पोराला-नवऱ्याला-बापाला.ह्या




बिनपगारी शिक्षकांच्या माय-बापाला,बायका-पोरांना उपाशी मारतांना पाहून काळीज उकळत्या पाण्यातल्या बटाट्यासारख होत.सगळ्या जगाला माहिती आहे.प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष का होईना राज्यकर्त्यांच्या शंभरपिढ्या जगतील एवढा पैसा त्यांच्याकडे आहे.तरीही पैशाचा मोह. प्रशासनापाई कवडीमोल असलेल्या ह्या अशा रक्कमे पाई का?विना अनुदानित शिक्षकांच नि डीएड-बीएड होऊन आयुष्य झिजवत फिरणाऱ्या जुन्या-नव्या शिक्षक पोरांचा तळतळा जीवाला लावू पाहता.
सरकारी हातात असलेला हक्काच्या मागणीसाठी,निवडून दिलेल्या सरकारला,मागण्या पुर्ण करा.सांगायला रस्त्यावर उतरून आंदोलने करावे लागत असून,तरीही अजून,त्यातून योग्य तो न्यान मिळतांना दिसत नाहीये..! एवढ सगळ दिसत असून,तरीही ह्या सरकारला ह्यांच्या जिवाची तळमळ अजूनही का समज नाहीये? या बिनपगारी शिक्षकाला आणि शिक्षण डीएड बीएड लावून नोकरी मागणाऱ्या पोरांना मार्केटमध्ये कुत्र विचारायला तयार नाहीये.डीएड-बीएडच नाव घेतलं की,खाजगी नोकऱ्याही मिळण कठीण झालेल दिसत आहे.अशी भयंकर दशा पाहून तरी किंव यावी या माय-बाप सरकारला.अजून किती दिवस अग्निपरीक्षा द्यावी लागणार आहे कुणास ठाऊक,या आग्नीपरिक्षेत सगळेच आरदे-आधूरे,नव्याने वाट पाहणारे सगळेच शिक्षक ओरडून-ओरडून मरतांना दिसायला लागले आहे.
अशा विनावेतन आयुष्य घालवणाऱ्या शिक्षकांना घरुन बायकांचा,लेकरांचा,म्हाताऱ्या माय बापांचा जेव्हा फोन येतो, तेव्हा अहो.,शाळेतून येतांना भाजी-पाला दूध घेऊ या.. किराणा घेऊन या.. आणि छोटंस लेकरु म्हणत पप्पा येतांना मला बिस्कीट घेऊन या..त्यात लाजत गाजत म्हातारे माय बाप म्हणता पोरा जमलं तर आमच्यासाठी गोळ्या आणता आल्या तर बघ...
खिशात पैसै नसलेला हा बिनपगारी शिक्षक,जो कुणाचा तरी मुलगा आहे.कुणाचा तरी नवरा आहे.कुणाचा तरी बाप आहे. अशा या बिनपगारी शिक्षक पोराला,नवऱ्याला,बापाला,रोज-रोज तेच-तेच दैनंदिन प्रश्न सतवत असतात.कुणी पैसै उधार देईल का..म्हणून शाळेच्या गावात चक्करा मारत असतो.विद्यार्थासमोर त्याच्याच पालकांकडून,थोड्या दिवसांसाठी माझी उसणवारी करा.अस म्हणतांना डोळे भरु येतांना बघवत नाही हो त्या बिनपगारी शिक्षकाकडे. रोज-रोज उसणवारी करायला आता माणसंच शिल्लक उरली नाही.आणि ज्यांनी-ज्यांनी उसणवारी दिली त्यांची-त्यांची उसणवारी अजून परत करता आली नाही.म्हणुन त्या पालकांसमोरुन जातांना तोंड लपवून जाव लागत.त्यात बिनपगारी शिक्षकाचे असे हाल पाहून पालकांच्या ही पोटात कालावते.त्यांना ही लाज वाटते उसणवारी परत मागायला. म्हणून तेही मास्तरला पैशासाठी हाटकत नाही.अशी अवस्था या विनावेतन शिक्षकांची आज झालेली दिसतीये. कधी-कधी तर आई वडीलांच्या गोळ्यांसाठी,मुलांच्या बिस्कीटासाठी,शाळा ते घर,घर ते शाळा.कधी पाई-पाई तर कधी लिफ्ट मागत-मागत,घरी-शाळेत याव-जाव लागत. बाहेर चहा-नाश्टा करण्याची हिंमतही त्याची होत नाही. अशा वेळी त्याची परिस्थिती त्याला हिनवते.स्वतःच्या जिंदगीवर हसते.काहीजण तर आर्धी भूक भागेल एवढाच डब्याला भाजी-पोळी शाळेत नेतांना-आणतांना दिसते.कारण उरलेल्या भाजी-पोळीत मुलांना शाळेत डबा नेता यावा म्हणून घरी उरवून ठेवतांना दिसतात-सांगतात.कधी-कधी पालक लोक त्यांना त्याच्या शेतातील काही भाजीपाला,डाळ-दाना देतात तेव्हा तर त्या संध्याकाळी पोट भर जेवायला मिळणार म्हणून त्या दिवशी जोमात आनंद घेऊन जगतांना काही शिक्षक दिसायला मिळतात.अशा ह्या लाजिरवाणी उपासमारीलाही सारख-सारख तोंड द्यावं लागतंय. हे ऐकून ऐकणाऱ्याच्या,पाहणाऱ्यांच्या,पोटात नक्कीच गोळा आल्याशिवाय राहणार नाही हे मात्र तितकच सत्य आहे.

(उर्वरित उद्याच्या अंकात)

# बाटलीबंध पाणी किती शुद्ध ?



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**कडाक्याचीउन्ह असो की शीत लहर असो थंड पाण्याला मागणी वाढल्याने शहरात व गावागावात ठिकठिकाणी पाणी विक्रीचे उद्योग सुरू झाले आहेत. शुद्ध केलेले थंड पाणी विकले जात असले तरी यातील बहुतांश विक्रेत्यांकडे पाणी विक्रीचा अधिकृत परवानाच नसल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या पाणी उद्योगांची तपासणी करण्याची गरज आहे. मध्यंतरीअन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) पाणी प्लँट तपासणी मोहिम हाती घेतली तेव्हा अनेकांडे अधिकृत परवाने नसल्याचे समोर आले.**

तुम्ही घरात किंवा ऑफिसमध्ये कधी ‘सील’ केलेली पाण्याची बाटली घेता का? याचे उत्तर ‘हो’ असेल तर सावधान! तुमची फसवणूक होत असल्याची शक्यता आहे. कारण पाच रुपयांचे नाणे टाकून दहा लिटर पाणी मिळणाऱ्या केंद्रातून या बाटल्या भरून त्यांची विक्री होत असल्याची खळबळजनक माहिती मिळाली आहे.
शहर असो की ग्रामीण आज सर्वत्र पिण्यासाठी फिल्टर पाणी मागितले जाते. माठातील किंवा भरलेल्या गुंडातील पाणी आज सहसा कोणी पिण्यास तयार नाही. आज सर्वांनाचं पिण्यासाठी शुद्ध पाणी हवे आहे. शुद्ध पाणी ही आपली मूलभूत गरज आहे. त्यामुळे आज जागोजागी पिण्याच्या पाण्याचे प्लांट लागलेले आहेत. पाणी विक्रीचा व्यवसाय जोरात आहे. व्यवसायातून अनेकांना रोजगार मिळत आहे. काही जणांनी स्वतःच्या घरात बोअर घेऊन पाण्याची व्यवस्था केली आहे. पाणी लागल्यानंतर शुद्धीकरण यंत्रणेद्वारे शुद्ध पाणी विकले जात आहे. त्यामुळे हा उद्योग चांगलाच बहरला आहे. मात्र आपण पीत असलेले बाटलीबंध पाणी किती शुद्ध आहे? या बाटलीबंध पाण्याची तपासणी कधी तरी होते का? पाणी शुद्धीकरण केंद्राची तपासनी कोण करतो? तक्रार कुठं करायची या सर्व प्रश्नांची उत्तरे समजून घेण्याची गरज आहे.
कडाक्याचीउन्ह असो की शीत लहर असो थंड पाण्याला मागणी वाढल्याने शहरात व गावागावात ठिकठिकाणी पाणी विक्रीचे उद्योग सुरू झाले आहेत. शुद्ध केलेले थंड पाणी विकले जात असले तरी यातील बहुतांश विक्रेत्यांकडे पाणी विक्रीचा अधिकृत परवानाच नसल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या पाणी उद्योगांची तपासणी करण्याची गरज आहे. मध्यंतरीअन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) पाणी प्लँट तपासणी मोहिम हाती घेतली तेव्हा अनेकांडे अधिकृत परवाने नसल्याचे समोर आले.
उन्हाळ्याच्या दिवसांत थंड पाण्यालामोठी मागणी असते. पाणी विक्रीचे उद्योग मोठ्या प्रमाणावर केले जातात. शहरात व गावागावात ठिकठिकाणी पाणी विक्रीची युनिट्स आहेत. या ठिकाणांहून पाणी पोहोच केले जाते. एका जारची किंमत तीस रुपये असते. काही विक्रेते पाणी फिल्टर करतात. यासाठी त्यांच्याकडे पाणी शुद्धीकरणाची स्वतंत्र यंत्रणा आहे. काही विक्रेते नळाला येणारे पाणीच जारमध्ये भरून विकतात. सीलबंद



पाण्याच्या विक्रीबाबत तक्रारी आल्यास एफडीएला कारवाईचे अधिकार आहेत. या पाणी उद्योगांची तपासणी करण्यात मात्र अधिकाऱ्यांना अडचणी येत आहेत.
एकतर तपासणीच्या कोणत्याही लेखी सूचना वरिष्ठांनी दिलेल्या नाहीत. तपासणी करतानाही केवळ विक्रेत्यांकडे परवाना आहे का याचीच पाहणी करणे आवश्यक आहे. उघड्या पाण्याची तपासणी अधिकार क्षेत्रात येत नसल्याने यावर कारवाई करणे अवघड होत असते. त्यामुळे सध्या या उद्योगांची पाहणी करणे मोठे अवघड होतं चालले आहे.
शहरातील अनेक कार्यालयांत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही. त्यामुळे या कार्यालयांना पाणी विकत घ्यावे लागत आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत लग्न समारंभ व इतर कार्यक्रमांचे आयोजन मोठ्या प्रमाणावर होत असते. त्यामुळे पाण्याला मागणी वाढत असते.. मंगल कार्यालयांतील पाण्याऐवजी फिल्टर केलेले थंड पाणी पिण्याकडे कल वाढला आहे.मंगल कार्यालयात तर साधे पाणी थंड करून जार मध्ये भरले जाते.याकडे लक्ष कोणाचेच नसते. बाटलीबंद पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता राखणे ही ‘एफडीए’ची जबाबदारी आहे. त्यासाठी पाण्याच्या उत्पादन कक्षाची स्वच्छता आणि पिण्याच्या पाण्याचा दर्जा बारकाईने तपासला जातो. त्यात दोष आढळल्यास उत्पादन थांबविण्यापर्यंतचे आदेश देण्याची तरतूद कायद्यात आहे.
प्रति दिवस दोन हजार लिटर किंवा त्यापेक्षा जास्त उत्पादन करणाऱ्या बाटलीबंद पाणी उत्पादक कंपनीला केंद्रीय परवाना आवश्यक असतो. त्यापेक्षा कमी उत्पादन क्षमतेच्या कंपनीला राज्य परवाना घेणे बंधनकारक असते. तसेच ‘बीआयएस’चा परवाना अत्यावश्यक ठरतो. दरवर्षी याचे नूतनीकरण महत्त्वाचे ठरते. बाटलीबंद पाण्यासाठी काही शंका असल्यास बाटलीबंद पाण्यासाठी तक्रार ‘एफडीए’कडे करता येते. औंध येथील सयाजीराव गायकवाड संकुलातील पाचव्या मजल्यावर हे कार्यालय आहे. १८००२२२२६५ या टोल फ्री क्रमांकावरही तक्रार नोंदवता येईल.‘बीआयएस’चे महत्त्व ‘आयएसआय’ मार्क असलेल्या बंद बाटलीतील पाणी घ्यावे. हे पाणी प्रयोगशाळेतून तपासणी केलेले असते. प्रक्रिया केलेल्या पाण्यात जिवाणूंची वाढ होत नाही. व्यवस्थित स्वच्छता असलेल्या ठिकाणी उत्पादन होते.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# जलदूत चळवळीचे जनक : किशोर शितोळे



डॉ. दत्ता देशकर
संपर्क क्र. 9325203109

आधुनिक केसरी

**औरंगाबाद शहरात जलक्षेत्रात कार्य करणारी जलदूत नामक एक संघटना कार्यरत आहे. किशोर शितोळे हे या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आहेत. गेल्या ९ वर्षा क्षेत्रात काम करीत आहेत. ही संस्था २०१४ साली स्थापन करण्यात आली. त्यांनी जलकार्यकत्यांचा व्हॉट्सअँप ग्रुप तयार केला आहे. या सारख्या माध्यमातून हे सर्व कार्यकर्ते एकमेकाशी जोडले गेलेले आहेत. एक कॉल देताच सर्वजण कार्यासिद्धीसाठी हजर राहतात. आजपर्यंत या सूपने जलसंधारणाची अनेक कामे केली आहेत, आपल्या पदाचा समाजाच्या भल्यासाठी कसा वापर करायचा हे ते चांगल्या प्रकारे ओळखतात. सध्या से देवगिरी नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष आहेत. त्याचबरोबर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कार्यकारीणीचे लाभला आहे. अशा प्रकारच्या बंधायांची साखळीच बांधली तर सदस्य पण आहेत. या दोनही पदांचा वापर ते जलसंधारणाच्या कामासाठी करत आहेत.**

फेरोसिमेंटचे बंधारे बांधणे, नाल्यांचे खोलीकरण व रुंदीकरण करणे, शहरातील व जिल्ह्यातील जुन्या बारवांचे पुनरुजीवन करणे, ग्रामस्थांना पाण्याचा सुयोग्य वापर करण्यासाठी प्रशिक्षण देने, वृक्ष लागवड करणे इत्यादी कामात त्यांनी स्थापन केलेली जलदूत संघटना काम करते. त्यांच्या संस्थेच्या माध्यमातून आतापर्यंत विविध ठिकाणी १६ गावात १८ बंधारे बांधण्यात आले आहेत. पैठण तालुक्यात बिडकीन, नांदलगाव, ताहेरपूर, धुपखेडा व गिधाडा या गावात प्रामुख्याने ही कामे केली गेली आहेत. गोल्डी नदीवर गिधाडा येथे बांधलेला फेरोसिमेंट बंधारा तर गावाला फारच उपयुक्त ठरला आहे. या धान्याची लांबी ४० फूट तर उंची ५ फूट अशी आहे. यासाठी गाववर्गणीतून ८०.००० रुपये जमा केले गेले, या कामामुळे जो जलसाठा निर्माण झाला आहे तो २.७० कोटी लिटर्स एवढा आहे. या गावाची लोकसंख्या ४०० वर आहे. या कामामुळे त्यांचा पाणी प्रश्न कायमचा सुटला आहे. याच नदीवर आणखी दोन बंधारे बांधण्याचा त्यांचा संकल्प आहे. प्रत्येकाने दोन तास गोल्डी नदीसाठी द्यावे आणि श्रमदान करावे असे आवाहन केल्यावर जवळपास १०० लोक एकत्र झाले. यात प्राध्यापक, शिक्षक. विद्यापीठातील विद्यार्थी, सरकारी अधिकारी समाविष्ट होते. दृष्टी असलेला नेता असला तर अनुयायी सहजपणे जमतात असे आपल्याला ठिकठिकाणी दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील त्यांच्या संस्थेचे कार्य तर वाखाणण्यासारखे आहे. या विद्यापीठाच्या प्रांगणात त्यांनी एक फेरोसिमेंट बंधारा बांधलेला आहे. या बंधायामुळे ३ विहीरी, पार बोअरवेल व दोन बारवा पुनरुजीवीत झाल्या आहेत. हा बंधारा बांधण्यात विद्यापीठाचे कर्मचारी, देवगिरी बँकेचे कर्मचारी, लहान

**काळाच्या ओघात कचराकुंड्या बनलेल्या ऐतिहासिक बार स्वच्छ करून, गाळ काढून त्यांना गतवैभवाकडे नेण्याची गरज आहे. बारवांतील पाणीसाठ्यावर प्रक्रिया करून त्याचा पिण्यासाठी वापर करता येईल.**
**- किशोर शितोळे,**
**अध्यक्ष जलदूत संस्था**



मुले, सकाळच्या वेळी फिरायला येणारे नागरिक यांचाही सहभाग लाभला आहे. अशा प्रकारच्या बंधा-याची साखळीच बांधली तर कोटयावधी लिटर पाणी जमिनीत जिरवता येईल व त्यामुळे विद्यापीठ परिसरातील भूजल पातळी वाढवण्यास मदत होईल, या पाण्याचा वापर विद्यापीठातील वनस्पती उद्यानाला पाणी पुरवण्यासाठी केला जावू शकेल. आपल्याला माहितच असेल की महाराष्ट्रातील शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठात विद्यापीठांनी खास योजना राबवून इतके पाणी जमा केले आहे की या दोन ठिकाणी नगरपालिकेकडून पाणी घेण्याची जनसंपर्क अधिकारी नेमण्यात आला आहे. आवश्यकताच उरलेली नाही. मी कितीळे साहेबांना विनंती करू इच्छितो की त्यांनी या दोन विद्यापीठांनी ज्या योजना राबवल्या आत त्यांचा अभ्यास करून मराठवाडा विद्यापीठालाही पाणी पुरवठ्याबाबत स्वयंपूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावा विद्यापीठाच्या हद्दीत एक मोठा तलाव पण आहे. हा तलाव गाळाने भरला होता, तो गाळ काढण्यातही या संस्थेने पुढाकार घेतला आहे. या कामासाठी विद्यार्थी सकाळी ६ वाजता कामावर हजर झाले आहेत. काही विद्यार्थी कामाचे नियोजन करतात. काही जण कामासाठी आयुधे जमा करतात. काही जण प्रत्यक्ष काम करतात तर काही जण काम करणाऱ्यांचा उत्साह वाढवण्यासाठी राष्ट्रीपर गाणी म्हणतात विद्यापीठ प्रांगणात जेवढया इमारती आहेत या सर्व इमारतीमध्ये जलपुनर्भरण यंत्रणा उभारली गेली आहे. आतापर्यंत विद्यापीठ पाणी खरेदी करत होते. त्यासाठी अंदाजे ४ से ५ लाख





रुपये खर्च येत होता, या कामामुळे तो होणारा खर्च वाचला आहे. पण आता बाहेरून येणाऱ्या पाण्याची मागणी शून्यापर्यंत खाली आणण्याची गरज आहे.

देवगीरी बँकेच्या एकूण एकतीस शाखा आहेत. सर्व मिळून बँकेचे आठ लाखांचे वर खातेधारक आहेत. या सर्व खातेधारकांसाठी संस्थेने जलपुनर्भरण कसे करावे यासाठी माहितीपत्रके तयार केली आहेत. शहरात प्लंबर असोसिएशन आहे. त्या संस्थेचे १५० चे वर सभासद आहेत. या संस्थेशी बँकने एक जॉइंट व्हेंचर केले आहे. प्रत्येक शाखेत नोटिस बोर्डवर चार प्लंबरची नावे व फोन नंबर देण्यात आले आहेत. ग्राहक त्यांचेशी संपर्क साधू शकतात. आपण समाजाचे काही देणे लागतो याची जाणीव फारच कमी तरुणांमध्ये दिसून येते, या दृष्टीने शितोळे साहेबांच्या कामाकडे बघितल्यास आशेचा एक किरण दिसायला लागलेला आहे. त्यांनी तरुणांना एकत्र करून पाणी प्रश्नाबद्दल त्यांना विचार करण्याला प्रोत्साहित केले आहे. असे प्रयोग गावोगाव सुरु झाले तर आपण पाणी प्रश्न सहजपणे सोडवू शकतो असा विश्वास वाटतो. ज्या ज्या सामाजिक संस्थांशी आपण जोडलो गेलो आहोत त्यांचा वापर करून जलसंवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचे काम प्रत्येकाने केले तर आपण जल स्वयंपूर्णता सहजपणे असे म्हणावेसे वाटते.

## जलदूत द्वारे मराठवाडयात ठिकठिकाणी पुनरुजीवन

पाणीटंचाईमुक्त मराठवाड्याचे स्वप्न उराशी गेल्या काही वर्षांपासून जलसंधारण, जलसंवर्धन क्षेत्रात जलदूत संस्था काम करत आहे. संस्थेचे अध्यक्ष किशोर शितोळे यांचा पुढाकार आणि लोकसहभागातून जलदूत ने औरंगाबाद शहरासह मराठवविध लोकोपयोगी कामांची उभारणी केली आहे. लोकसहभाग उपपदस्य अधिकाऱ्यांची साथ श्रमदानातून काळाच्या ओघात लोप पावत चाललेल्या शहरातील ऐतिहासिक बाह्य संवर्धन अभियान उभे राहिले. त्यातून काही बारवांनी अनेक वर्षांनंतर आता मोकळा प्यायला सुरुवात केली आहे.

औरंगाबाद शहराजवळ श्री खंडोबाचे सातारा येथे बाव असून पुण्यश्लोक अहिल्यागेवी होळकर यांनी ती बांधलेली असल्याने ऐतिहासिक महत्व आहे. या गावात पाणीपुरवठयाची कुठलीही ठोस व्यवस्था नव्हती. त्यामुळे नागरिकांना नेहमीच टंचाईला सामोरे जावे लागत असे. महापालिका टँकरने पाणी देत होती. पण त्यावर मर्यादा होती. दुसरीकडे दुर्लक्षित बारव कचरा दगड माती यामुळे बुजत ढासळत चालली होती. या बारवांना गतवैभव प्राप्त करून देण्याचे कार्य जलदूत ने केले. संस्थेच्या टीममध्ये नोकरदार, उद्योजक व्यावसायिक, विद्यार्थी असून सुटीच्या दिवशी संबंधित भागातील लोकांना सोबत घेवून श्रमदान केले जाते. शहरातील मुकुंदवाडीमधील गम भरलेली बारव जलदूत ने स्वच्छ केली.

परिसरातील नागरिकांना टंचाईच्या काळात या बारवचा फायदा होत आहे. वानखेडेनगरातील बारवेचेही असेच पुनरुजीवन करण्यात आले. समर्थनगर भागातील बारव स्वच्छ केल्यानंतर परिसरात एक शाश्वत जलसोत पुनरुज्जीवित झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या परिसरात झाडाझुडपांनी वेढलेल्या दगडगोट्यांनी भरलेल्या गंगा बारवेचेही या टीमने गतवैभव प्राप्तकरून दिले. आता ही बारव पाण्याने तुडुंब होते.

**अद्भिः सर्वाणि भक्तानि जीवन्ति प्रभवन्ति च**
**समात् सर्वेष दानेषु पयोदानं विशिष्यते।।**

अर्थात सर्व प्रणिमात्रांचे जीवन हे पाण्यावरती अवलंबून आहे. पाण्याच्या सुयोग्य वापरातून प्राणिमात्रांचे पालनपोषण होते. त्यामुळे पाणी हे जीवन आहे. पाण्याचे दान हे विशेष दान म्हणून मानले




जाते. प्रत्येक औधषाही मूळ पाणी असते. औषध म्हणून पाणी ग्रहण केल्यास ८० टक्के आजार बरे होतात. श्रीराम वि. धानोरकर, प्रधानाचार्य श्री ब्रम्हानंद वेद पाठशाळा.

**बारव एक ऐतिहासिक वारसा**

मराठवाड्याला बाबांनाही ऐतिहासिक वारसा लाभला आहे. आड, विहीर म्हणजे बार कधीकाळी गावे, शहरांतील त्या त्या भागांची तहान भागविण्याचे काम या बारव करीत, प्रमुख स्रोतांपैकी त्या असत. सध्या अनेक बार अखेरची घटका मोजत आहेत. मात्र जलदूत हा ऐतिहासिक वारसा जपण्याचा प्रयत्न करीत आहे. जलसंधारण संवर्धनावर या स्वयंसेवी संस्थेने - मराठवाडयात अनेक गावांच्या पाणीरश्नावर महत्वपूर्ण काम केले आहे.

## बारवांचा असा इतिहास

किशोर शितोळे म्हणाले, बारव स्थापत्य हे महाराष्ट्रातील एक जाणीवपूर्वक विकसित केलेले शास्त्र होते. तसेच त्या त्या स्थापत्याने बारवनिर्मितीसाठी अतिशय अचूकपणे जलस्रोत शोधला होता, हे वैशिष्ट म्हणावे लागेल, साधारण आठव्या शतकापासून ते चौदाव्या शतकापर्यंत रावनिर्मिती मोठ्या प्रमाणात होत होती.

चौदाव्या शतकानंतर जही यादवकालीन शैलीतील मंदिरांची निर्मिती झाली. तशी अशा प्रकारच्या बारवांची निर्मितीही थांबली. पुढे अठराव्या शतकात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी व त्याच्यासारख्या काही जांनी पुन्हा जाणीवपूर्वक प्राचीन स्थापत्याला प्रोत्साहन दिले. प्राचीन बारवांचा जिर्णोध्दार केला. काळानुरूप पाणी व्यवस्थापन बदलले, बार दुर्लक्षित होत गेल्या. बारवनिर्मिती करताना पुनर्भरणाच्या दृष्टीने गावाच्या परिसरात जलाशय असायचे. वाढत्या नागरीकरणामुळे हे जलाशयही नष्ट होत गेले. परिणामी, बारवांचे पुनर्भरण होणे अव झाले, तरीही आजही अनेक ठिकाणच्या बारव पाण्याने भरलेल्या आहेत. त्यांचा वापर होत आहे. त्यांचे संवर्धन गरजेचे आहे.

## बारव संवर्धनासाठी सर्वतोपरी मदत करणार : जिल्हाधिकारी

समर्थनगर येथील बारव स्वच्छ करण्यासाठी देवगिरी बँकेच्या कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेतला आहे. १५० कर्मचारी व परिसरातील नागरिकांनी यामध्ये सहभाग नोंदवला, देशभक्तीपर गाणे भारत माता की जय, वंदे मातरम अशी घोषणाबाजी करत स्वच्छता करण्यात आली. यावेळी सुनील चव्हाण यांनी जलदूतच्या या कामाचे कौतुक करत बारव संवर्धनासाठी सर्व मदत करणार असल्याचे आश्वासन दिले.समर्थनगरात सकाळीच घमेले, फावडे, झाडू, दोरी, हेल्मेट, सेफ्टी बेल्ट, कुन्हाडी अशी सुन तयारी करत श्रमदानासाठी कर्मचारी एकत्र आले होते. मनपाकडूनही अद्विशामक दलाचे पथक, कचरा गाड़ी पथक, पाणी उपसण्याचा पंप अशी तयारी करण्यात आली होती. दोन तासांत पंधरा ट्रिप कचरा, झुडपे तोडण्यात आली.

## आम्ही केवळ कृती करणार

देवगिरी बँकेचे अध्यक्ष किशोर शितोळे यांनी सांगितले, औरंगाबाद शहराच्या पाणी प्रश्नावर केवळ पायख चर्चा होते. मात्र प्रत्यक्षात कृती होत नाही. त्यामुळे अशा चर्चा करण्यापेक्षा प्रत्यक्ष कृतीतूनच उपाय करता येवू शकतात हे वारंवार करून दाखवले आहे. यावेळी देवगिरीच्या माध्मयातून जिल्ह्यातील बारवांचे संवर्धन, बोअरवेल पुनर्भरणाची माहिती दिली. सहायक पोलिस उपायुक्त बालाजी सोनटके यांनी जलसंवर्धनासाठी नागरिकांनी प्रत्येक पावसाचा थेंब साठविणे गरजेचे आहे. हे आपले आद्य कर्तव्य समजून युवकांनी या झोकून देण्याचे आवाहनही त्यांनी केले. यावेळी माजी नगरसेवक समीर राजूरकर यांनी देवगिरी बँक व जलदूतांचे कौतुक केले. या वेळी डॉ. अभय कुलकर्णी, श्रीकांत उमरीकर, देवेंद्र देव, प्रा. संजय गायकवाड संचालक जयंत अभ्यंकर, मुख्य कार्यकारी अधिकारी रविन नांदेडकर, जयंत देशपांडे, अमृता पालोदकर, मनाली कुलकर्णी, संजीवनी शेजूळ, दत्ता हुड, विकास ठाले, सिध्दार्थ साळवे यांची उपस्थिती होती. आभार संजय गायकवाड यांनी मानले.





# अनोखा कथनात्मक अनुभव: 'लाओग्राफिया'



सुजाता राऊत
ठाणे, मुंबई

आधुनिक केसरी

**डॉ. बाळासाहेब लबडे यांची यानंतरची कादंबरी "शेवटची लाओग्राफिया" पुन्हा एकदा कादंबरीचा रूढ आकृतीबंध, आशयकेंद्रे,रचनाबंध ओलांडून नवीन वाटांचा शोध घेत आहे. या कादंबरीच्या शीर्षकापासून अंतरंगापर्यंत आशयाचा वेध अनेक जाणकार समीक्षकांनी घेतला आहे. आज या कादंबरीतील भाषिक वैशिष्ट्य, रूपकात्मकता व रचना या अनुषंगाने काही मुद्दे समोर आणण्याचा हा प्रयत्न आहे.**

मानवी आयुष्य ,त्यातील भावभावना, सौंदर्य ,नाट्य यांचा प्रभावी पट उलगडण्यासाठी कादंबरी हा साहित्यप्रकार अतिशय महत्त्वाचा आहे. मानवी मन हे निबिड अरण्यासारखं असतं. त्यातील भावभावनांचा शोध घेणे म्हणजे अरण्यवाटा धुंडाळणेच असते. डॉ बाळासाहेब लबडे यांच्या " पिपिलिका मुक्तिधाम" या प्रयोगशील कादंबरीने मराठीत एक महत्त्वाचा टप्पा नोंदवला आहे. अनेक समीक्षकांनी या कादंबरीच्या रूपकात्मक स्वरूपाची व त्यामधील अर्थनिर्णयानाची सांगोपांग चर्चा केली आहे.

डॉ. बाळासाहेब लबडे यांची यानंतरची कादंबरी "शेवटची लाओग्राफिया" पुन्हा एकदा कादंबरीचा रूढ आकृतीबंध, आशयकेंद्रे,रचनाबंध ओलांडून नवीन वाटांचा शोध घेत आहे. या कादंबरीच्या शीर्षकापासून अंतरंगापर्यंत आशयाचा वेध अनेक जाणकार समीक्षकांनी घेतला आहे. आज या कादंबरीतील भाषिक वैशिष्ट्य, रूपकात्मकता व रचना या अनुषंगाने काही मुद्दे समोर आणण्याचा हा प्रयत्न आहे.


रूढार्थाने याही कादंबरीला नायक नाही पण निवेदक आहे. तटस्थपणे तो आपल्या आजूबाजूचे जग न्याहाळतो आहे. त्याची दृष्टी तटस्थ असली तरी बारीक-सारीक तपशील तो टिपत जातो. ही पारंपारिक निवेदन पद्धती नाही. हा निवेदक एका विद्यार्थ्याच्या भूमिकेत आहे. गाव सोडून वसतीगृहावर राहणारा, प्रतिकूल परिस्थितीचे चटके सोसत तो इथवर आलेला आहे. त्याच्या संवेदनक्षम मनात आजूबाजूच्या अनेक घटनांचे तरंग उमटत आहेत. त्याच्या वसतीगृहात असणारे वातावरण स्वतःच्या शैलीमध्ये तो टिपत जातो. तसंच तिथे राहणारे दिलप्या, बनसोडे ,बाळा सालटे, सागर अशा अनेक व्यक्तिरेखा समोर येतात. निवेदकाच्या स्वप्नात वारंवार पंख असणारा घोडा येतो. हीच ती अगंतुक व्यक्तिरेखा आहे. हाच निवेदकाचा अल्टर इगो आहे असं म्हणता येईल. ही विविध स्वरूपात आपल्यासमोर येते. निवेदक रहातो तिथे बाजूलाच असणारे स्मशान, तिथे चालणारे क्रियाकर्म,भूत प्रेताची अघोरी दुनिया व त्याला दिलेले ग्रीक लोककथेचे आयाम असा एक गहन पट कादंबरीकाराने चित्रित केला आहे. उदाहरणच घ्यायचे झाले तर," तो असा आपल्याच विश्वात जगणारा आहे. गळ्यात शबनम घालून लुटून चालत राहतो. ती कधीही काढत नाही. त्याचा बाप कंडक्टर आहे. त्याच्या गावातलं वातावरण विसरू शकत नाही. गावाच्या टेकडीवर मारुतीचं मंदिर आहे. ही सगळी पोरं तिकडंच पडीक असतात. गावात तीन दिवस मिळेल ते काम करायचं आणि तीन दिवस बसून खायचं असं जगणं त्याला चांगलं वाटतं. मागच्या आठवणीत रमायला त्याला आवडतं."(पृष्ठ क्र 45)

व्यक्तीचित्रणापेक्षा या कादंबरीत जी कथनशैली आहे तिला स्वतःचे असे एक वैशिष्ट्य आहे. कवितेमध्ये जशी अनोखीकरणाची प्रक्रिया असते तशा प्रकारचे रचनातत्व कथनात्मक साहित्यामध्ये रशियन रूपवाद्यांनी शोधले. कथनामध्ये घटनाक्रम किंवा गोष्ट (fabula किंवा fable) हा एक सामग्रीच्या पातळीवरचा घटक असतो. तर या क्रमाची मोडतोड करून त्याच्याशी विविध प्रकारे खेळ करून त्याचे अनोखीकरण करणारा कथनक्रम किंवा कथानक suzhet किंवा plot हे रूपदायी साधन वा तंत्र असते. घटनाक्रमाच्या प्रवाहाला छेद देऊन अनोखीकरण साधणाऱ्या साधनांचे कार्य हे काव्यातील नादाच्या व लयीच्या रुपदायक तंत्रासारखेच असते. घटनांची पुनरावृत्ती पूर्वचित्रण (फ्लॅशबॅक) त्यातून निर्माण होणारी कालतत्त्वाची आंदोलने,कथनाची गती कमी जास्त करण्याच्या क्लृप्त्या, मुद्दाम केलेले विषयांतर प्रमुख विषयसूत्राला हुलकावण्या देणारी अनेक साधने, प्रदीर्घ वर्णने यासारख्या कथनात्मक क्लृप्त्यांचा यात अंतर्भाव होतो. 17 व्या शतकातील सर्वांतिस या स्पॅनिश लेखकाची डॉन क्विओट ही कादंबरी किंवा आठव्या शतकातील स्टोन या इंग्लिश लेखकाची ट्रीस्टम सँडी ही कादंबरी यांच्याबरोबरच रशियन रूपवादी समीक्षकांनी लोककथांचा विचारही यासंदर्भात केला आहे.

शेवटची लाओग्राफीया या कादंबरीतील कथनात्मक पद्धत, निवेदकाचे शैली त्यामधून येणारी प्रदीर्घ वर्णने या सगळ्याचा विचार केला तर रशियन रूपवादी समीक्षकांनी केलेली मिमांसा पद्धती या कादंबरीसाठी चपखल ठरते.उदा. " मनात एक चिंतेचा महापूर .... माझ्या मनात आनंदाची लहर उमटली. बाहेरचं आकाश मला सुंदर वाटू लागलं. म्हणजे पावसाचे दिवस सरून गेले होते, गणपती संपून नवरात्रीचे दिवस होते. पण तसं इथं सगळं शांत शांत होतं शहरात असूनही नसल्यासारखा मी चालत राहिलो, चालत राहिलो. आपल्याच आनंदात . मनातील चिंतेचा महापूर कधीच वाहून गेला होता आईच असावी ;जी आपल्या पाठी आपल्यावर घारी सारखे लक्ष ठेवून असते"(पृष्ठ 105)

ई.एम फोस्टर या इंग्रजी समीक्षकांनीही गोष्ट व कथा यामध्ये भेद केलेला आहे.परंतु तो कालक्रम व कार्यकारणभाव यातील भेदांवर आधारलेला आहे. गोष्ट म्हणजे घटनांचा कालक्रम तर कथानक म्हणजे घटनांची कार्यकारण भावानुसार लावलेली संगती असे तत्व अभिप्रेत आहे. परंतु आधुनिक साहित्य सिद्धांतानुसार कार्यकारण भावाला साहित्याचे व्यवच्छेदक लक्षण म्हणता येणार नाही. साहित्याच्या आशयाचा एक पैलू म्हणूनच त्याचा उल्लेख करावा लागेल.

लाओग्राफिया मध्येअशा अनेक गोष्टी वाचायला मिळतात. पण त्यात रुढ अर्थाने कथानक नाही.त्यातील अनेक पात्र आपल्याला गोष्ट सांगतात. उदाहरणार्थ बनसोडेने आपली सुरुवात गोष्ट सुरू केली "असंच एक गाव आहे रसनापूर ...ते अलीकडे खूप चर्चेत आलं आहे.सगळ्या माध्यमांनी त्याची चर्चा केली आहे." (पृष्ठ 61)मग स्वानंद सदानंद लकडेची गोष्ट सुरू होते. तसंच संदेश हा कोकणी बोलीभाषेत धीरगंभीर आवाजात अशीच गोष्ट सांगतो. या अनेक गोष्टीतून एक वेगळं अनाकलनीय जग उभं रहातं, जे आजवर मराठी लेखनात मुख्य प्रवाहात आलेलं नाही. यात सतत आगंतुक व्यक्तीरेखा ही येत राहते. यूपीएससी करणाऱ्या मुलांचा जग,त्यांची स्पर्धा ,त्यांचं गाव सोडून शहरात येणं,मनात सतत उपरेपणाची जाणीव असणं, शहरात मनाची




बीजं न रुजू शकणं, भोवतीची स्पर्धा, कोलाहल, भ्रष्टाचार या सगळ्यांचं एक कोलाज आपल्यासमोर उभं राहतं.

पुढे या कादंबरीत लोककथाच बोलायला लागते "इमॅजिन युअर हँडसम प्रिन्स /लुक युवर फ्रॉग इन द फेस/ द पाँड ऑफ अग्ली फ्रॉग्स" (पृष्ठ 84,85)या छोट्या कथनांतून तात्विक विचार मांडलेले आहेत. ब्लादिमिर पॉप या लोकसाहित्याच्या संशोधकाचा "मॉर्फोलॉजी ऑफ द फॉकटेल" ( 1928/ 1968) या ग्रंथात रुपवादी तत्त्वांचा वापर मोठ्या प्रमाणावर केला आहे. त्याच्या दृष्टीने लोककथा वरवर पाहता अनेकविध रूपात अवतरत असल्या तरी मूलभूत रचना तत्वांच्या दृष्टीने खूपच सारख्या असतात. या पात्रांना हा कथानकात निश्चित व स्थिर स्वरूपाची कार्य व भूमिका असतात. म्हणजेच ते कथानकाचे रूपदायी घटक असतात. काव्यामध्ये नादमयतेला व लय तत्वाला जे स्थान असते तेच स्थान कथनामध्ये पात्रांनी पुन्हा पुन्हा केलेल्या कृतींना व त्यांच्या पुन्हा पुन्हा आवृत्त होणाऱ्या कार्यांना असते. म्हणजेच कथनामध्येही वास्तवाचे, वास्तविक घटनांचे अनोखीकरण होते.

शेवटची लाओग्राफीया वाचताना अनेकदा घटनांच्या अनोखीकरणाचा हा अनुभव आपल्याला येतो. घटनांमध्ये व सांगण्याच्या पद्धतीमध्ये एक गती आहे पण तटस्थता आहे. कादंबरी कथनातील एक अभिनव प्रयोग म्हणून याकडे पाहता येईल. सहसा कादंबऱ्यांमध्ये जे भावनांचे प्रकटीकरण, मानसिक आंदोलनही दाखवण्याचा लेखकाचा कल असतो. पण लाओग्राफीयामध्ये असं न करता तटस्थपणे सूचन येते. नाटकांमध्ये आधुनिक प्रवाहात जसे न-नाट्य दिसते तसे या कादंबरीत दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. अरुण कोलटकर, मनोहर ओक, मंगेश काळे यासारख्या कवींनी जशी प्रयोगशील कवितेची मांडणी केली तशीच कादंबरी प्रकारात मराठीमध्ये श्याम मनोहर, किरण नगरकर यांनी केली. डॉ बाळासाहेब लबडे यांनीही मराठी कादंबरीतील कथनात्मक पातळीवरची प्रयोगशीलता दाखवली आहे ती स्वागतार्ह आहे.मूलतः या लेखकांची प्रकृती कवीची आहे. त्यामुळे शैली ,शब्द ,अनुबंध, सादरीकरण याबाबतीत काव्यात्मताही अनेक ठिकाणी दिसते. कधी छोट्या पत्रातून आशय व्यक्त होतो, कधी ईमेल तर मध्येच काही मुक्तछंदातून असे प्रकटीकरण होतं. उदाहरणार्थ.."मी सगळ्यांविषयी लिहितो आहे...

हे काळपुरुषा!
आकाशाच्या पटलावर गवताची माडी
बांधण्याचा तुझा मनोदय
कधी येतो पावसाळा,
तर कधी येतो उन्हाळा
चिमटीत आपल्याला तू पकडणारा
प्रतिभेच्या ढगांवर बसून अलगद
निरोप काही धाडत असतो
वारा अंगात भिनवून
वावटळीसम भटकत असतो" (पृष्ठ क्र145)

रचना, आशय, कथनपद्धती, भाषाशैली या सर्वच आघाड्यांवर प्रयोगशीलता दाखवणारी ही कादंबरी समजून घेण्यासाठी वाचकाकडेही तशीच बौद्धिक बैठक असणे मात्र आवश्यक आहे.

या कादंबरीत एकसूत्री कथा नसले तरी अनेक पात्रे मनात रेंगाळत राहतात. उदाहरणार्थ कचऱ्याचे पात्र किंवा निवेदकाचे आईशी असलेले नाते.शेवटी लेखकाने म्हटलेय ". कथा रसाळ असते म्हणून ती खरी असत नाही. खरे असतात ते आपले डोळे आणि कान. त्यात चार बोटांचे अंतर असते. हे अंतर कळू नये म्हणून बरेच मंतर केले जातात. त्या मंत्रात असतात फक्त शब्द, त्यांची अनुप्रासयुक्त एक मंतरलेली अफूची लय. शेवटी भाषाच ती जेवढी गूढ तेवढा माणूस संभ्रमित होत जातो..."

अशा प्रकारे बुद्धीला खाद्य देणारी, नवे आयाम देणारी कादंबरी संपताना लोककथा निवेदकाच्या डोक्यावरून मायेचा हात फिरवते. एक वेगळा अनुभव देऊन हे पुस्तक वाचकाला संपन्न करतं. सरदार जाधव यांनी शीर्षकांनुरुप उत्कृष्ट मुखपृष्ठ केले आहे. अथर्व पब्लिकेशनने या पुस्तकाची सुंदर निर्मिती केली आहे.

**शेवटची लाओग्राफिया (कादंबरी),**
**लेखक : डॉ बाळासाहेब लबडे, प्रकाशन :अथर्व पब्लिकेशन्स, पृष्ठे :196**

# श्री विष्णु सहस्त्रनाम आणि तुळशी अर्चनाचे महत्त्व

आधुनिक केसरी

**श्रीक्षेत्र करवीर येथे धर्मदत्त नावाचा सत् शील ब्राह्मण राहत होता. बालपणापासूनच तो विष्णुभक्त होता. माता पित्याच्या मृत्यूनंतर संसाराचा पाश मागे लावून न घेता त्याने ब्रह्मचारी राहून प्रभुसेवेचे व्रत घेतले. पंचगंगेवर त्रिकाल स्नान, संध्या करून तो नामस्मरणात दंग असे. त्यासाठी त्याने श्री विष्णु सहस्त्रनामाचा आश्रय घेतला. जागृत अवस्थेत त्याच्या मुखात सदैव श्री विष्णु सहस्त्रनाम असे. अगदी भिक्षा मागताना, इतकेच नव्हे तर रस्त्याने चालतानादेखील तो श्री विष्णु सहस्त्रनामाचा घोष करीत असे. विविध उपवनांमधून तुलसी मंजिरी जमा करून सायंकाळी श्री विष्णु सहस्त्रनामासह, श्री लक्ष्मी- नारायणास सहस्त्र मंजिरी (तुळस) अर्पण करण्याचे त्याचे व्रत अखंड चालू होते. त्यासाठी तो पंचगंगेवर सायं संध्या करून हाती पळी-पंचपात्र व गंगेत बुडवून स्वच्छ केलेल्या सहस्त्र तुलसी मंजिरी घेऊन ओल्याने विष्णुसहस्त्रनामाचा घोष करीत श्री लक्ष्मी-नारायण मंदिरात जात असे.**

तो ज्या मार्गाने मंदिराकडे जात असे त्या मार्गावर एक मोठा पुरातन अश्वत्थ वृक्ष होता. त्याच्या आश्रयाने एक शापभ्रष्ट पिशाच्चीनी वास्तव्य करीत असे. ती लहान मुलांना त्रास देत असे. लोक त्या मार्गाने जात नसत. त्यामुळे तो मार्ग निर्जन होता. सायंकाळी तर त्या मार्गाकडे कोणी फिरकतही नसे. तुलसी अर्चनाचा धर्मदत्ताचा हा क्रम वार्धक्यापर्यंत चालू होता. त्याच्या येण्याकडे ही पिशाच्चीनी डोळे व कान लावून असे.कारण दृष्टिपथा -त आलेल्या धर्मदत्ताचे श्री विष्णु सहस्त्रनाम कानावर पडल्याने तिला खूप बरे वाटे. हळूहळू तिची पिशाच्च वृत्ती पालटू लागली. अनेक वर्षे श्री विष्णु सहस्त्रनाम श्रवण झाल्याने त्या पुण्याने तिच्या मुक्ततेची वेळ जवळ आली आणि एके दिवशी धर्मदत्त समोरून येताना पाहून तिने मनात निश्चय केला. तो अश्वत्थाजवळ येताच तिने त्याच्या पायी लोटांगण घातले व ती रडू लागली. तिच्या रडण्याने धर्मदत्ताला तिची दया आली. त्याने तिला रडण्याचे कारण विचारले. तेव्हा तिने आपली अवस्था सांगून या पिशाच्च योनीतून मुक्ती देण्याची विनंती केली. धर्मदत्ताने तिला सांगितले की, "मी एक साामन्य ब्राह्मण आहे. वेद, शास्त्र, पुराण मंत्र, तंत्र काहीही जाणत नाही. बालपणा -पासून केवळ स्नानसंध्या, पूचाअर्चा व सायंकाळी तुलसी अर्चन एवढेच करतो. मी तुझा उद्धार कसा करणार?"

यावर पिशाच्चिनीने त्याला सांगितले की, "तुझ्याजवळ श्री विष्णु सहस्त्रनामाचे पुण्य अपार साचले आहे. त्यात तुलसी अर्चना -च्या पुण्याची भर पडली आहे. या सर्व पुण्याचे मला दान करून तु माझी मुक्तता कर. तु दानाचा संकल्प सोडताच माझी या पिशाच्च योनीतून मुक्तता होईल"असे सांगून तिने धर्मदत्ताचे पाय धरले व दीनपणे रडू लागली. तिच्या या हृदयद्रावक रडण्याने धर्मदत्ताला तिची दया आली. त्याने विचार केला आपल्याकडून जर तिचे दुःख दूर होत असेल तर काय हरकत आहे असा विचार करून त्याने हातात पाणी घेऊन त्याने आपले आजवरच्या श्री विष्णु सहस्त्रनामपाठाचे व सहस्त्र तुलसी अर्चनाचे पुण्य तिला अर्पण करीत असल्याचा संकल्प केला व त्या पाण्याचे तिच्यावर सिंचन केले. त्याबरोबर तिला दिव्य स्वरुप प्राप्त झाले. हा चमत्कार पाहून धर्मदत्त आश्चर्यचकित झाला. पण दुसऱ्याच क्षणी त्याला आपली शक्ती नष्ट झाल्यासारखे वाटू लागले व त्याच्या मनात विचार आला की, "माझ्या आजवरच्या आयुष्यातील सर्व पुण्य मी या पिशाच्चीनीला दिले व मी पुण्यहीन झालो. वार्धक्यामुळे मी ही लवकरच मरणार; पण पुण्यक्षय झाल्यामुळे आपली अवस्था काय होईल? कुठल्या नीच योनीत, कदाचित नरकातही आपली रवानगी होईल". या विचाराने तो रडू लागला. त्याला आता खरोखरच आपण भिकारी झालो असे वाटू लागले. त्याच्या मनात नैराश्यामुळे आत्मघाताचे विचार येऊ लागले. त्याची अशी अवस्था पाहून त्याचे आराध्य दैवत भगवान श्रीहरी विष्णुंना त्याची कणव आली. 'न वासुदेव भक्तांनां अशुभं विद्यते क्वचित' या फलश्रुतीतील वचनाचा प्रत्यय आणून देण्या साठी श्री महाविष्णु वृद्ध ब्राह्मणाच्या रुपाने तेथे आले व धर्मदत्ताला त्यांनी रडण्याचे कारण विचारले. घडलेल्या सर्व घटनेचे वर्णन करताच ब्राह्मणरुपी विष्णू हसू लागले. धर्मदत्ताला त्यांच्या अनाठायी हसण्याचा राग आला. तो रोषाने म्हणाला, "मी इथे दुःखाने रडतो आहे आणि तुम्ही माझ्या रडण्याला हसता आहात! जणू माझी चेष्टा करता आहात". त्यावर ब्राह्मणरुपी श्री हरी विष्णु म्हणाले, "हसू नको तर काय करू? कारण तुम्ही नेमके उलटे करीत आहात. तुम्हाला ज्या गोष्टीने



आनंद होण्याऐवजी तुम्ही रडत आहात व दुःख करीत आहात". दिङमुढ होवून पाहत असलेल्या धर्मदत्ताकडे दयार्द्र दृष्टीने पाहत त्यांनी स्पष्टीकरण केले की, "अहो! या पिशाच्चीनीला श्री विष्णु सहस्त्रनाम पठणाचे पुण्य दान केल्याने तुमचे सर्व पुण्य नष्ट झाले, असे तुम्ही म्हणालात व त्यामुळे दुःखी होवून शोक करीत आहात हेच मुळी चुकीचे आहे. याउलट या पिशाच्चीनीला पुण्य दान केल्यामुळे तुमचे पुण्य शतपटींनी वाढले आहे.ते किती वाढले ते मी भविष्यवेत्ता असल्या -ने मला समजले व आनंद झाल्याने मी हसू लागले". धर्मदत्ताला हायसे वाटले. त्याला आपले भविष्य जाणून घेण्याची उत्सुकता वाटू लागली. त्याने क्षमा मागून ब्राह्मणरुपधारी श्री हरी विष्णुंना नमस्कार केला व आपले भविष्य सांगण्याची विनंती केली. तेव्हा श्री हरी विष्णु सांगू लागले की, "या पिशाच्चीनी -ला तू पुण्यदान केल्याने तुझे व तिचे पुण्य एवढे वाढले आहे की, पुढील जन्मात तुम्ही पती-पत्नी होवून प्रत्यक्ष श्री महाविष्णु तुमच्या पोटी पुत्ररुपाने अवतार घेतील. धर्मदत्ता! तुझा पुढील जन्म अयोध्येचा राजा अज व त्याची पत्नी इंदुमती यांचे पोटी होऊन तू दशरथ राजा या नावाने ख्यात होशील. ही पिशाच्चीनी पुढील जन्मात कोशल राजाची कन्या महाराणी कौसल्या होवून तुम्हा दोघांचा विवाह होईल. तुमच्या पोटी श्री महाविष्णु 'राम' हा सातवा अवतार घेतील". धर्मदत्ताच्या मनात शंका आली ती त्याने बोलून दाखविली की मी ब्राह्मण असता पुढील जन्मी मला क्षत्रियत्त्व कसे प्राप्त होईल. त्यावर हसून ब्राम्हणरूपधारी श्री महाविष्णु म्हणाले की,"तुलसी अर्चनासाठी सहस्त्र तुलसी जमा करताना तू काहीवेळा लघूशस्त्रां- चा वापर केलास.त्या पापाने तुझे ब्राह्मणत्व जाऊन तुला क्षत्रियत्व प्राप्त होत आहे. तसेच तू ब्रह्मचारी असल्याने तुला पुत्रप्रेमाचा अनुभव नाही. पुढील जन्मात श्रावणाच्या पित्याकडून पुत्रप्रेम कसे असते तेही तुला माहिती होईल. ही पिशाच्चीनी तर मुक्त झालीच आहे. योग्य काळी तिला जन्म प्राप्त होईल. तूही आयुष्याच्या अंतापर्यंत असेच श्री विष्णु सहस्त्रनाम पठण व श्री विष्णुभक्ती करत रहा म्हणजे तुझे कल्याण होईल" असा आशिर्वाद देऊन श्री महाविष्णु गुप्त झाले. श्री विष्णु सहस्त्रनाम पठणाच्या पुण्याने प्रत्यक्ष श्री भगवंताचे माता-पिता होण्याचे भाग्य लाभते.

# रावण दहन



औरंगाबाद  शहरातील सिडको एन-७ येथे रावण दहाचा समारंभ मोठ्या उत्साहात नी पारंपारिक पद्धतीने संपन्न झाला. केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत  कराड महाराष्ट्राचे सहकारमंत्री अतुल सावे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला. दोघांही मंत्री महोदयांनी पौराणिक ऐतिहासिक महत्त्व आपल्या भाषणातून सांगत कार्यक्रमाची रंगत वाढवीली. रावण दहनाच्या या ४० वर्षांची परंपरा लाभलेल्या कार्यक्रमास रसिकांनी उदंड प्रतिसाद दिलेला होता. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश जोशी यांनी समर्थपणे केलेले होते. पोलीस आयुक्त डॉ. निखील गुप्ता, उत्तरायण संघाचे उद्योगपती, एन.के. गुप्ता, नितीन गुप्ता, बापू घडामोडे, गणेश नावंदर अशा मान्यवरांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

छायाचित्र : सुधीर कोर्टीकर

## बनावट पिस्तूल बाळगणाऱ्या व्यक्तीच्या आवळल्या मुस्क्या



आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** पोलीस निरीक्षक दत्तात्रय शिंदे यांना बातमीदाराकडून बातमी मिळाली आहे की, एक इसम हॉटेल कृष्णकमल, आर्वी ता. जि.धुळे समोर हायवे रोडला थांबलेला असून त्याने त्याचेजवळ देशी बनावटीचा गावठी कट्टा त्याने अवैधरित्या बाळगलेला आहे. अशी बातमी मिळाल्यावरून धुळे तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी सापळा रचून शिताफीने ०१.३० वा.चे सुमारास छापा टाकून त्या ठिकाणी असलेल्या इसमास पकडले. त्याचे कब्जात गावठी कट्टा व जिवंत काडतूस मिळून आले पकडलेल्या इसमाचे नांव मोहम्मद ईस्माईल शफी वय ४५ वर्षे रा. लालबाग बहूनका बंदीशोबाबा की दर्गा जवळ, इंदौर, मध्यप्रदेश असे असल्याचे त्याने सांगीतले. ( १ ) १५,०००/ - रु किंचा एक देशी बनावटीचा गावठी कट्टा ( बंदुक ) लोखंडी असलेला, मॅगझीन नसलेला , काळे रंगाची वक्राकार ग्रीप असलेली, बंदुकीच्या मध्यभागी एक मोठे बटन असलेली , जु.वा. ( १ ) २,००० / - रु किंचे एक जिवंत काडतुस त्याचे पृष्ठभागावर KF CMM असे कोरलेले असलेले जु.वा .. एकूण १७,००० / - चा याबाबत धुळे तालुका पोलीस स्टेशन भारतीय शस्त्र अधिनियम कलम प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्याचा तपास पोउनि सागर काळे हे करत आहेत. अशाप्रकारे नमूद पोलीस अधिकारी व कर्मचारी अशांनी कोशल्याने विनापरवाना गावठी कट्टा बाळगणाऱ्या इसमास पकडून कारवाई केलेली आहे. सदरची कारवाई ही मा. विशेष पोलीस महानिरीक्षक सो नाशिक परिक्षेत्र, नाशिक श्री.बी.जी.शेखर पाटील सो, मा. पोलीस अधीक्षक धुळे श्री. प्रविणकुमार पाटील सो . मा . अपर पोलीस अधीक्षक धुळे श्री . प्रशांत बच्छाव सो . मा . उपविभागीय पोलीस अधिकारी साक्रो विभाग श्री. प्रदीप मैराळे सौ पोलीस निरीक्षक श्री दत्तात्रय शिंदे सो यांचे मार्गदर्शनाखाली धुळे तालुका पोलीस स्टेशन येथील पोलीस उप निरीक्षक सागर काळे , असई विंचूरकर , प्रविण पाटील , मुकेश पवार , धिरज सांगळे , कुणाल शिगाणे . नितीन दिवसे , कांतीलाल शिरसाठ , राकेश मोरे यांनी केली आहे.

## नादरपूर ग्रामपंचायततर्फे ‘लेट्स रीड इंग्लिश’ पुस्तकाचे मोफत वितरण



आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** विजयादशमीच्या शुभ मुहूर्तावर सोने लुटले जाते. मात्र हे सोने शिक्षण रुपी असेल तर? हो! ही केवळ कवी कल्पना नाही तर हा स्तुत्य उपक्रम नादरपुर (ता. कन्नड) ग्राम संसदेच्या वतीने खरा करून दाखवला आहे.

इंग्लिश भाषा वाचनाच्या संदर्भात क्रांतिकारी आणि ऐतिहासिक पुस्तक असा नावलौकिक असलेले ‘लेट्स रीड इंग्लिश’ हे पुस्तक येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना मोफत वितरीत करण्यात आले. वाचनाची पारंपारिक पद्धती आणि आधुनिक उच्चार पद्धती यांचा संतुलित समतोल हे या पुस्तकाचे वैशिष्ट्य असून व्हिडिओच्या माध्यमातून इंग्लिश वाचन शिकविणारे हे महाराष्ट्रातील एकमेव दर्जेदार पुस्तक आहे. प्रत्येक लेसनच्या सुरुवातीला क्यू. आर. कोड दिलेले असून ते मोबाईलवर स्कॅन केल्याबरोबर तो लेसन व्हिडिओच्या रूपात आपल्यासमोर येतो. केवळ 30 दिवसात इंग्लिश वाचन शिकविणाऱ्या या पुस्तकाचा उपयोग नेमका कसा करायचा हे या वेळेस पुस्तकाचे लेखक तथा व्याख्याते डॉ. संजय गायकवाड यांनी सोदाहरण स्पष्ट केले.

पुस्तक वितरण सोहळ्याचे अध्यक्षस्थान निवृत्त प्राचार्य पी. एम. डहाके यांनी भूषविले. इंग्लिश ही जगाची खिडकी असून या खिडकीचा अंगीकार करावा असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले. मोफत पुस्तक वितरण समारंभास सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत कर्मचारी वृंद, सोसायटी संचालक, तंटामुक्ती अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व सदस्य, जिल्हा परिषद शाळा शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांसह विद्यार्थ्यांची लक्षणीय उपस्थिती होती.

## प्रत्येक घरात धम्म रुजविणे गरजेचे



आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** येथील महात्मा फुलेनगरमध्ये 66 व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त डॉ. मिलिंद आठवले यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमांतर्गत बौध्द धम्माचे गाढे अभ्यासक उत्तम भगत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या वेळी बोलताना ते म्हणाले की, भगवान गौतम बुद्ध यांच्या धम्माने जगाला शांततेचा संदेश देत एका नव्या समाजाची निर्मिती केलीआहे. प्रज्ञा, शील, करुणा व मैत्री भाव जपला

### धम्म अभ्यासक उत्तम भगत यांचे प्रतिपादन

पाहिजे तरच आपण खऱ्या अर्थाने सुसंस्कारित पिढी घडवू शकतो. तसेच प्रत्येक घरात आज बौद्ध धम्म रुजविणे गरजेचे आहे. याप्रसंगी दिवंगत प्रा. पांडुरंग आठवले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. मिलिंद आठवले यांनी केले. सूत्रसंचालन हनुमंत पाईक यांनी केले. पाहुण्यांचा परिचय गव्हांदे यांनी करून दिला, तर आभार प्रदर्शन प्राजक्ता आठवले यांनी केले. कार्यक्रमाला अ‍ॅड. रवींद्र तायडे, जावळे साहेब, प्रा. रवी गव्हांदे, डॉ. मुरलीधर इंगोले, प्रा. शिलवंत गोपणारायन, प्रा. युवराज आठवले, प्रमित आठवले व रक्षित आठवले उपस्थित होते.



# माझी जेवरी... झाली पुस्तकांची पंढरी..!

आधुनिक केसरी न्यूज

**संजय जेवरीकर**

**जेवरी :** कालचा दिवस माझ्यासाठी भाग्याचा होता..जेवरी येथे उभारण्यात येणाऱ्या ग्रंथालयाच्या आव्हानाला प्रतिसाद देत महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या जिल्ह्यातून पुस्तकांनी सीमोल्लंघन करत जेवरीत प्रवेश केल्याच्या निमित्ताने ग्रंथदिंडी आणि पुस्तकांचे पूजन कार्यक्रम संपन्न झाला..संतपरंपरेची साक्ष देणारी,साहित्य संमेलनाची आठवण करून देणारी ग्रंथ दिंडी काल आकर्षणाचे केंद्र ठरले..गावातील बँड पथक,लेझीम पथक,शाळेतील विद्यार्थ्यांनी धोतर आणि साडी नेसून केलेला पारंपरिक पोशाख,हातात टाळ आणि रामकृष्ण हरीचा ठेका धरत अंगणवाडी ताई आणि समस्त शिक्षकवृंदानी धरलेला ठेका साहित्य पंढरीची आठवण करून देणारा होता..गावभर महिलांनी दिंडीचे केलेले स्वागत,पुस्तकांची पूजा आणि डोक्यावर तुळशीचे वृक्ष ठेवून काढलेली ही दिंडी म्हणजे जणू नवी पंढरीच अवतरली की काय असे भासत होते..




या आव्हानाला प्रतिसाद देत जवळपास 2 हजार पुस्तके दाखल झाली, काही येत आहेत,काहीजणांनी गठ्ठे मोठे असल्याने पार्सल व्यवस्थेच्या कारणांनी पोचले नाहीत तरीही हे ग्रंथालय जनतेच्या अडगळीत पडलेल्या पुस्तकाच्या जोरावर 10 लाख पुस्तकांचा आकडा नक्कीच गाठणार आहे..सर्व प्रकारची पुस्तके या ग्रंथालयात दाखल झाली आहेत..दोन मजली इमारतीत हे ग्रंथालय उभारण्याच्या माझ्या संकल्पाला गावकऱ्यांचा उदंड प्रतिसाद आहे.. एक आगळंवेगळं ग्रंथालय येथे उभारले जाणारे असून,येणाऱ्या काळात स्पर्धात्मक युगात पाऊल टाकण्यासाठी किमान 2 हजार पुस्तके स्पर्धात्मक विषयाची येथे उपलब्ध होणार आहेत.. शाळेसाठी स्वतंत्र ग्रंथालयाची उभारणी करण्याचा मनोदय काल व्यक्त केला आहे..ही ग्रंथदिंडी म्हणजे जेवरीची पंढरी ठरली आहे.. सुरवातीला सांगवी केंद्राचे केंद्रप्रमुख सूर्यवंशी विलास, सरपंच संजय जेवरीकर, महाराष्ट्र विद्यालय जेवरीचे मुख्याध्यापक नागेश तुबाकले,जिल्हापरिषदेचे मुख्याध्यापक संजय तांबोळे यांच्या हस्ते विविध ग्रंथानी सजवलेली ग्रंथ दिंडीच्या पालखीचे पूजन करण्यात आले व गावातून जिल्हापरिषद शाळा जेवरीचे विध्यार्थी, महाराष्ट्र विद्यालयाचे विध्यार्थी, गावातील भजनकरी मंडळी, जिल्हापरिषद शाळेचे लेझीम पथक,विविध वेशभूषेत सहभागी विध्यार्थी व बँडबाजा यांच्या तालावर वाजतगाजत भव्यदिव्य ग्रंथ दिंडी ची मिरवणूक काढण्यात आली. प्रत्येक विध्यार्थ्यांच्या हातात पुस्तके देण्यात आली होती. वाचाल तर वाचाल,ग्रंथ हेच गुरू,ज्याच्या घरी नाही पुस्तकाचे कपाट त्याचे आयुष्य होईल सपाट, ज्याच्या घरी तुकोबांची गाथा त्याचा चांगला राहील माथा, सही पुस्तक सही मस्तक अशा घोषणांनी सर्व परिसर दणाणून गेला. अनेक घरापुढे या ग्रंथ दिंडीचे पूजन करण्यात आले. अंगणवाडी ताईंनी भजनांचा ठेका धरला तर गुरुजनांनी लेझीमच्या तालावर ठेका धरला. सरपंच,केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक यांनाही मोह आवरला नाही तेही विध्यार्थ्यांच्या सोबत ताल धरले. ही ग्रंथ दिंडी पाहण्यासाठी गावातील महिलांनी प्रचंड गर्दी केली. साहित्यसंमेलनात जशी साहित्याची पंढरी अवतरते तशीच अवस्था आज जेवरीत पहायला मिळाली. विध्यार्थ्यांच्या मनामध्ये प्रचंड उत्साह दिसत होता. गावकऱ्यांना ही पालखीला खांदा दयावा वाटत होते. ग्रंथ दिंडीचा समारोप जिल्हापरिषद शाळेच्या मैदानात करण्यात आला व उपस्थित गावकरी मंडळींच्या हस्ते पुस्तक व ग्रंथाचे पूजन करण्यात आले व पुस्तकांचे प्रदर्शन मांडण्यात आले आणि सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी संजय तांबोळे, तुबाकले नागेश यांनी आपले मनोगत व्यक्त केले तर अध्यक्षीय समारोप करताना संजय जेवरीकर यांनी त्याना सुचलेली कल्पना व त्यानी वाचून झालेली पुस्तके भेट देण्याचे केलेले आवाहन व मिळालेला प्रचंड प्रतिसाद याची सविस्तर माहिती दिली दोन हजार पुस्तके यात ग्रामगीता, तुकोबांची गाथा, संविधान, स्पर्धा परीक्षा, जनरल नॉलेज अशी सर्व प्रकारची पुस्तके आहेत दहा हजार पुस्तकांचे वाचनालय सुरू करून दोनमजली ग्रंथालयाची इमारत उभी करण्याचा संकल्प केला व हे सर्वांसाठी खुले असणार आहे याची ग्वाही दिली. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन जाधव एम एम यांनी केले तर आभार कलशेट्टी पी एस यांनी मानले यावेळी गावातील स्त्री पुरुष दोन्ही शाळेचा शिक्षक स्टाफ,व विध्यार्थी यांची लक्षणीय उपस्थिती होती.

# ‘विश्वशांती महाविहार’ करिता सर्वोतोपरी सहकार्य करणार : आमदार नमिता मुंदडा

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** बुद्धिस्ट फाऊंडेशन ऑफ इंडिया यांच्या वतीने बुधवार, 5 ऑक्टोबर रोजी नियोजित ‘विश्वशांती महाविहार’, ‘लुंबिनी पार्क’, मांडवा रोड, अंबाजोगाई येथे भव्य धम्म महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. धम्म महोत्सवात आदरणीय भदन्त धम्मसार (किल्लारी, जि.लातूर) यांचे धम्मदेसना - धम्मप्रवचन झाले. तर उद्घाटक म्हणून ॲड. संघराज रूपवते (उच्च न्यायालय, मुंबई.) आणि समारोप सत्रात आमदार सौ. नमिताताई मुंदडा यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभली. धम्म महोत्सव उद्घाटन, धम्म प्रवचन, “स्वरविहार” हा बुद्ध व भीमगीतांचा प्रबोधनपर कार्यक्रम आणि समारोप अशा चार सत्रात आयोजित करण्यात आला होता. धम्म महोत्सवास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



अध्यक्षीय समारोप करताना आमदारनमिताताई मुंदडा म्हणाल्या की, आपल्या सर्वांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महान कार्याचा सार्थ अभिमान आहे, तथागत गौतम बुद्ध यांनी आपणांस मानवता, शांती, करूणा यांची शिकवण दिली. तथागत गौतम बुद्ध आणि बोधीसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आत्मसात करून आयुष्यात वाटचाल करावी, ‘विश्वशांती महाविहार’ या करिता आमदार फंडातून सभागृह आणि आवश्यक ती सर्वोतोपरी मदत व सहकार्य केले जाईल असे आमदार सौ.मुंदडा म्हणाल्या. यावेळेस धम्म महोत्सवाचे आयोजना करिता पुढाकार घेणारे व्यवस्थापन समितीचे संयोजक प्रा.डी.जी. धाकडे, प्राचार्य डॉ. कमलाकर कांबळे यांचे आमदार सौ. नमिताताई मुंदडा यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. समारोप सत्राचे सूत्रसंचालन डॉ. राहूल धाकडे यांनी केले तर उपस्थितांचे आभार डॉ. कमलाकर कांबळे यांनी मानले. धम्म महोत्सवाच्या ठिकाणी आयोजकांकडून प्रशस्त व्यवस्था करण्यात आली, तसेच पोलीस प्रशासनाकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. अंबाजोगाई बस स्थानक ते धम्म महोत्सवाच्या नियोजित ठिकाणी जाण्यासाठी सकाळी 10 ते 11.30 आणि सायंकाळी 5.30 ते 7.30 या वेळेत बसची विशेष व्यवस्था करण्यात आली होती. या महोत्सवात धम्म प्रेमी जनता आणि बौध्द उपासिका, उपासक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

धम्म महोत्सवाच्या यशस्वितेसाठी व्यवस्थापन समितीचे संयोजक प्रा.डी.जी.धाकडे, प्राचार्य डॉ.कमलाकर कांबळे, ॲड. सुनिल सौंदरमल, राजेंद्र घोडके, डॉ.सर्जेराव काशिद, अशोक भोजने, प्रा.मोहिनी अतुल सिताप, उत्तमराव डोंगरे, डॉ.राहुल धाकडे, डॉ.एम.व्ही.कानेटकर, अशोक शेळके, महादू मस्के, लंकेश वेडे, संतोष शिनगारे, एस.एम.बगाडे गुरूजी, डॉ. सुरेंद्र भिवगडे, विलास गायकवाड, प्रा.अनंत कांबळे, सूर्यकांत जोगदंड, बाबा गवळी, राजपाल जोगदंड, संभाजी सातपुडे, मिलिंद जोगदंड, जितेंद्र पोटभरे, डॉ.शंकर वाघमारे, रवि पोटभरे, धम्मपाल वैद्य, टोपाजी जोगदंड, व्यंकट वेडे, मल्हारी जोगदंड, शशिकांत सोनकांबळे, डी.एन.आचार्य, डॉ.संतोष बोबडे, भगवानराव ढगे, प्रियदर्शी मस्के, शिला उत्तमराव डोंगरे, प्रतिभा वाघचौरे, भिमाशंकर शिंदे, ज्ञानोबा वैद्य, मनोज इंगळे, रविंद्र आचार्य, लक्ष्मण दासूद, अरूण रोडे, प्रा.आर.आर,तागडे, आश्रुबा कांबळे, ऍड.किरण कांबळे, मारूती सरवदे, डॉ.नवनाथ सोनवणे, दादासाहेब कसबे, रमेश गायसमुद्रे, गौतम कांबळे, ज्ञानोबा रोकडे, भरत खांडके, ललितताई घोडके, डॉ.प्रशांत दहिरे, अतुल ढगे, विशाल जोगदंड, सुनंदा भास्कर घाडगे, माया महादेव धावारे, शिल्पा सचिन गायकवाड, जयश्री वाव्हळ यांच्यासह सर्व सन्माननीय सदस्यांनी पुढाकार घेतला.

# भारताचा मूळ धम्म म्हणून डॉ. आंबेडकरांनी बौद्ध धम्म स्वीकारला : डॉ. प्रदिप गोखले

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** गौतम बुद्धांनी प्रज्ञा करुणेतून दुःख मुक्तीचा मार्ग सांगितला. आदर्श भिख्यू कसा असावा याची आचारसंहिता निर्माण केली व सर्वसामान्य लोकांना आपले तत्त्वज्ञान साध्या व सोप्या भाषेत सांगितले. त्यामुळे आधुनिक कालखंडात ईश्वरवादाला नाकारुन बौद्ध धम्म डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वीकारला असे प्रतिपादन डॉ. प्रदिप गोखले यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबकडकर मराठवाडा विद्यापीठाच्या गौतम बुद्ध अभ्यासन केंद्रातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धम्माची दिक्षा घेऊन 66 वर्ष पुर्ण झाल्यामुळे त्यांनी केलेले धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनानिमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. ‘‘बौद्ध तत्वज्ञानातील स्थित्यंतरे व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा धम्म’’ या विषयावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथील तत्वज्ञान विभागाचे प्राध्यापक डॉ. प्रदिप गोखले यांचे व्याख्यान आयोजित केले होते. त्यावेळी त्यांनी बुद्धांनी जी तीन धर्मचक्र परिवर्तन केले ती सारनाथ, राजगृह, वैशाली येथील वर्णने नागार्जून व त्याचा योगाचार, दुःख, मौन, दिग्नाग, वास्तववादी संकल्पना, जातीभेद, महायान ते तंत्रज्ञान पंथाचा प्रभाव, अत-दिप-भव जीवनातील विविध समस्यांचे निराकरण याचे यथार्थ चित्रण स्पष्ट केले.



आधुनिक कालखंडात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनेक धर्मांचा अभ्यास करुन भारतीय मातीतील धम्मच स्वीकारण्यांमागची अनेक कारणे सांगितली. त्यामध्ये बुद्धाचा वैज्ञानिक दृष्ट्रिकोन आत्मसात करुन भारतीयांना नवयान बुद्धीझम दिला. बौद्ध धर्मातील सर्व पंथांचा अभ्यास करुन त्यांनी साध्या व सोप्या भाषेत सामान्यजनांना बुद्ध धम्म देऊन भारतात एक नवक्रांती केली असे प्रतिपादन यावेळी त्यांनी केले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्र. कुलगुरु श्याम शिरसाट यांनी बौद्ध धर्माचे जे तत्वज्ञान आहे ते सम्यक सम बुद्ध असून त्याचा आधुनिक कालखंडात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वीकार करुन त्यांनी भारतीय समाजाला नवी दिशा देण्याचे कार्य केले असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व व्याख्यानाची भूमिका गौतम बुद्ध अध्यासन केंद्राचे संचालक डॉ. संजय मून यांनी मांडली तर, सुत्रसंचालन डॉ. रेखा मेश्राम यांनी केले. आभार डॉ. संजय पाईकराव यांनी मानले या कार्यक्रमाला यशवंत भंडारे, प्राचार्य यशवंत खडसे, डॉ. प्रज्ञा साळवे, डॉ. क्षमा खोब्रागडे, डॉ. किशोर सुर्यवंशी, डॉ. सचिन बनसोडे, डॉ. सुशिल कांबळे, श्री. प्रकाश तुपे, डॉ. रवी खिल्लारे, अर्जून पट्टेकर, सुरेश मादळे, राहुल बचाटे, निलेश जाधव व शहरातील मान्यवर उपस्थित होते.

# स्व. नाना पालकर स्मृती राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा ११ ऑक्टोबरला

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या खोलेश्वर महाविद्यालयामध्ये प्रतिवर्षीप्रमाणे या वर्षीही स्व. नाना पालकर स्मृती राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन मंगळवार, दिनांक ११ ऑक्टोबर २०२२ रोजी सकाळी १० वाजता करण्यात आले आहे. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ हे खोलेश्वर महाविद्यालयाचे सुवर्णमहोत्सवी वर्ष होते. सुवर्णमहोत्सवी वर्षापासून ही स्पर्धा राज्यस्तरीय स्वरूपात साजरी केली जात आहे. या स्पर्धेत जास्तीत जास्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन संयोजक तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मुकूंद देवर्षी यांनी केले आहे. सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येईल. स्पर्धेचे सांघिक शुल्क शंभर रूपये असेल, सहभाग घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपल्या संघाची नोंदणी खाली उल्लेख केलेल्या ई-मेल वर करावी. महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांना संलग्न असलेली वरिष्ठ महाविद्यालये, कनिष्ठ महाविद्यालये तसेच माध्यमिक विद्यालयांना जोडून असलेल्या उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना या स्पर्धेत भाग घेता येईल. प्रत्येक संघातील स्पर्धकांच्या गुणांची बेरीज करून संघाचे एकूण गुण मोजले जातील व अधिक गुण मिळविणाऱ्या संघाला स्मृती चषक देण्यात येईल.



पूर्वनोंदणी केलेल्या स्पर्धकांच्या एक वेळ भोजनाची व्यवस्था केली जाईल. परिस्थितीनुसार स्पर्धेचे स्वरूप व नियमांमध्ये बदल करण्याचा संपूर्ण अधिकार संयोजकास असेल याची सर्वांनी नोंद घ्यावी. स्पर्धेची पारितोषिके पुढीलप्रमाणे आहेत. प्रथम पारितोषिक - स्मृतिचिन्ह व रोख रूपये ५,५०१/- , द्वितीय पारितोषिक - स्मृतिचिन्ह व रोख रूपये ३,५०१/- , तृतीय पारितोषिक - स्मृतिचिन्ह व रोख रूपये २,५०१/- , तसेच प्रत्येकी ११,००/- रूपयांची दोन उत्तेजनार्थ पारितोषिके ठेवण्यात आली आहेत. विद्यार्थ्यांनी आपली नोंदणी स्पर्धाप्रमुख प्रा.डॉ.दिगंबर मुडेगावकर - संपर्क क्रमांक - ७०२०५८२९९५ (मेल आयडी - digambarmudegaonkar@gmail.com) स्पर्धा सहप्रमुख प्रा.शाम बारडकर संपर्क क्रमांक - ८८३०४६०८०५ (मेल आयडी - baradkar.sham@gmail.com) यांचेकडे करावी असे आवाहन स्व.नाना पालकर स्मृती राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे संयोजक तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मुकूंद देवर्षी यांनी केले आहे.

काही गुप्त गोष्टी
कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी,
वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व
उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.
नवजीवन
आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in